।। ॐ ।।

।। श्रीगुरुलिंगजंगम प्रसन्न ।।

**श्रीदासराम ग्रंथमाला पुष्प – ३०**

# प. पू. मातोश्री
# माईसाहेब यरगट्टीकर
# यांचे चरित्र

**प्रा. डॉ. के. वा. आपटे**

● प्रकाशिका ●

**सौ. माया केशव आपटे**

आवृत्ति पहिली सांगली इ.स. २०११

**प. पू. मातोश्री माईसाहेब यरगट्टीकर यांचे चरित्र**

प्रकाशिका :
**सौ. माया केशव आपटे**
यजुर्वेद अपार्टमेंट, एस.टी. कॉलनी रोड,
विश्रामबाग, सांगली ४१६ ४१५.

लेखक :
**प्रा. डॉ. के. वा. आपटे**

**प्रथम आवृत्ति, २०११**

मुखपृष्ठ : **श्रीरघुनाथप्रिय साधुमहाराज मठ, श्रीक्षेत्र चिमड**

प्रकाशन दिन :
गुरुवार दि. २८/०४/२०११
चैत्र वद्य ११, शके १९३३
(वरूथिनी एकादशी)

सर्व हक्क प्रकाशिकेचे स्वाधीन

मुद्रक :
**गजेंद्र प्रिंटींग प्रेस**
पेठभाग, गुजर बोळ, सांगली.
फोन : (०२३३) २३७४३१९

प्रत मिळणेचे ठिकाण :
**दीपक चंद्रशेखर केळकर**
'श्रीराम निकेतन', ८२७, गांवभाग, सांगली ४१६ ४१६.
भ्रमणध्वनी : ९८२२००७५२८

**प्रसादमूल्य : रु. ५०/-**

## अनुक्रमणिका

■ आशीर्वाद
■ प्रकाशिकेचे मनोगत
■ प्रार्थना
■ गौरव
■ प्रस्तावना
■ उपन्यास

१. प्रकरण पहिले .................................... १
२. प्रकरण दुसरे ....................................१२
३. प्रकरण तिसरे ...................................२५

## --- आशीर्वाद ---

।। श्री सद्‌गुरुनाथ प्रसन्न।।

ते कुंडलिनी जगदंबा । जे चैतन्यचक्रवर्तीची शोभा ।
जया विश्वबीजाचिया कोंभा । साऊली केली ।।
(ज्ञानेश्वरी ६-२७२)

प.पू. सद्‌गुरू माईसाहेबमहाराज यांचे चरित्र प्रा. डॉ. के. वा. आपटे यांनी लिहिल्याचे ऐकून मला फार आनंद झाला. आतापर्यंत श्रीनिंबरगीकरमहाराज, रघुनाथप्रिय साधुमहाराज, लक्ष्मीबाई अक्का, रामभाऊमहाराज व माझे आजोबा श्रीनारायणमहाराज यांची चरित्रे प्रा. डॉ. के. वा. आपटे यांनीच लिहिली असून ती प्रसिद्धही झाली आहेत. परंतु प.पू. माईसाहेबांचे चरित्र अद्याप लिहिले गेले नव्हते व ते लिहिणेसुद्धा अवघड होते. माईसाहेबांच्या जन्मापासून ते निर्याणापर्यंत जे जे प्रसंग त्यांच्या आयुष्यात घडले, त्यांची सर्व माहिती एकत्र करून त्यांनी हे चरित्र लिहिले आहेत. हे चरित्र वाचन केले असता त्यांचा थोडाफार जीवनपट डोळ्यापुढे उभा राहतो.

थोरल्या महाराजांच्या (रामभाऊमहाराजांच्या) एका वाक्यावर या मठात माईसाहेबांनी कितीतरी कष्ट उपसले होते. मठात सारखे लोक यायचे पण कधीही कंटाळा केला नाही. सर्वांना लळाच लावला. ज्यावेळी माईसाहेबांनी थोरल्या महाराजांना अभ्यास मागितला, त्यावेळेला 'हाच तुमचा अभ्यास नीट करा, म्हणजे सर्व श्रेय तुम्हाला मिळेल,' असे आश्वासन रामभाऊमहाराजांनी माईसाहेबांना दिले होते. माईसाहेबांचा देह ठेवायचा काळ ज्यावेळी जवळ आला होता, त्यावेळी श्रीनारायणमहाराजांना आवश्यक असणारी क्रिया करून नारायणमहाराजांनी माईसाहेबांना सद्‌गती प्राप्त करून दिली. याचा उल्लेख 'नारायणीय शिष्यप्रबोध' या ग्रंथात 'पुत्रधर्म' या शीर्षकाखाली आला आहे.

अशा या चरित्राच्या योगाने प.पू. माईसाहेबांनी केलेले कार्य व आचरण हे चिमड सांप्रदायिकांना निश्चित मार्गदर्शक ठरेल, असा माझा विश्वास आहे.

माईसाहेबांचे चरित्र लिहिणारे प्रा. डॉ. के. वा. आपटे, प्रकाशित करणाऱ्या सौ. माया केशव आपटे यांना सद्‌गुरुनाथांचे पूर्ण आशीर्वाद लाभोत व माईसाहेबांची छाया त्यांच्यावर व सर्व वाचकांवर सदैव राहो, तसेच उत्तरोत्तर प्रा.डॉ. के. वा. आपटे यांचे हातून अशीच सेवा घडत राहो, अशी सद्‌गुरुनाथांचे चरणी प्रार्थना करतो व येथेचे पूर्णविराम घेतो.

।। राजाधिराज सद्‌गुरुनाथ महाराज की जय ।।

**– जनार्दन विश्वनाथ यरगट्टीकर**

## --- प्रकाशिकेचे कथन ---

माझे पति प्रा.डॉ. के.वा. आपटे हे संस्कृत आणि अर्धमागधी या भाषांचे अध्यापन करीत. ते करीत असतानाच त्यांनी उपनिषदे, ब्रह्मसूत्रे, भगवद्‌गीता, सांख्यदर्शन, जैनदर्शन, बौद्धदर्शन, अध्यात्म, शंकराचार्यांचे प्रकरणग्रंथ, रामानुजाचार्यांचे श्रीभाष्य, मध्वाचार्यांचे खंडनत्रय, कालिदासाची नाटके व कुमारसंभव, स्वप्नवासवदत्त, ज्ञानेश्वरमहाराजांचे अभंग व अनुभवामृत, समर्थ रामदास स्वामींचा ग्रंथराज दासबोध, चिमड संप्रदाय, मराठी भाषा, प्राकृत भाषांची व्यकरणे, संस्कृत व्याकरणातील दोन शब्दांची १०८ संधिरूपे, प्राकृत व अपभ्रंश शायरी, विद्यारण्यांची पंचदशी, रामगीता, रामरक्षा, अध्यात्म रामायण, आनंद रामायण, इत्यादी विषयांवर विपुल लेखन केले. त्यातील काही ६० नियतकालिकांत प्रसिद्ध झाले, तर काही ग्रंथरूपाने प्रकाशित झाले. त्यांचे हे लेखन संस्कृत, इंग्रजी, हिंदी आणि मुख्यतः मराठी या भाषांतून होते. त्यांच्या काही लेखनाबद्दल त्यांना पारितोषिके आणि पुरस्कार मिळाले.

''माझ्या लेखनामागे श्रीदासराममहाराज केळकर यांचे आशीर्वाद आहेत. तसेच श्री. शं. गो. गोखले हे शिक्षक आणि प्रा.डॉ. त्रिं. गो. माईणकर या गुरुजनांच्या शुभेच्छा आहेत आणि माझ्या घरातील सर्व कुटुंबियांचे सहकार्य आहे,'' असे ते नेहमी सांगतात. ते येथे नमूद करावेसे वाटते.

शंकराचार्यांचे प्रकरणग्रंथ, भगवद्‌गीता आणि संतचरित्रे हे त्यांच्या आवडीचे विषय आहेत. चिमड संप्रदायातील पाच संतांची त्यांनी लेखनबद्ध केलेली चरित्रे प्रकाशित झालेली आहेत. आता, त्यांनी लिहिलेले 'प.पू. माईसाहेबमहाराज यरगट्टीकर यांचे चरित्र' हे पुस्तक मजकडून प्रकाशित होत आहे. या चरित्राची कच्ची मुद्रिते तपासण्याचे काम माझे चिरंजीव प्रा. नारायण, माझी स्नुषा सौ. पद्मावती आणि मा. दीपक केळकर यांनी मोठ्या आस्थेने केले आहे. मी त्यांचे कौतुक करते.

प.पू. माईसाहेबांचे पणतू प.पू. जनार्दनमहाराज यरगट्टीकर यांनी हे चरित्र वाचून त्याला आशीर्वाद दिला आहे. मी त्यांची ऋणी आहे.

दासराममहाराजांचे ज्येष्ठ आणि श्रेष्ठ चिरंजीव श्री. चंद्रशेखर अण्णा आणि त्यांचे नातू श्री. दीपक यांनी आपलेपणाने काही शब्द दिले, त्याबद्दल मी त्यांची कृतज्ञ आहे.

या ग्रंथाच्या मुद्रणाचे काम गजेंद्र प्रिंटींग प्रेसचे संचालक श्री. सतीश लोखंडे व त्यांचा कामगारवर्ग यांनी सुबकपणे केले आहे. मी त्यांचे आभार मानते.

ज्या दासराममहाराजांच्या इच्छेने हे सर्व घडले, त्यांना प्रणाम करून मी येथेच हे कथन पुरे करते.

**– सौ. माया केशव आपटे**

## --- प्रार्थना ---

चिमड येथील प.पू. सद्गुरू श्रीरामचंद्रावजीमहाराज यरगट्टीकर यांच्या अधिकारसंपन्न पत्नी प.पू. सद्गुरू श्रीमाईसाहेबमहाराज यरगट्टीकर यांचे चरित्र आमच्या ती.प.पू. श्रीसद्गुरू श्रीदादांच्या अंतरंगातील एक साधक प्रा.डॉ. के.वा. आपटे तथा ती केशवकाका यांनी लिहिले असून ते त्यांच्याच सुविद्य पत्नी सौ. माया आपटे प्रकाशित करीत आहेत.

प.पू. सद्गुरू श्रीमाईसाहेबमहाराज यरगट्टीकर या साधारण १९३९ चे सुमारास सांगलीस आल्या होत्या. त्यावेळी त्या नित्यशः सकाळचे वेळी आमचे घरी येत असत. आमच्या ती.प.पू. श्रीमामामहाराजांची नित्याची उपासना, नित्याचे कीर्तन, त्यांचे ते साधन व त्यांचा अधिकार पाहून श्रीमाईसाहेबमहाराजांनी आमचे श्रीमामांना अनुग्रह देण्याची आज्ञा केली. आमच्या श्रीमामांचा स्वभाव पाहता त्यांनी ती आज्ञा लगेच अमलात आणली नाही; पण वारंवार जेव्हा श्रीमाईसाहेबमहाराजांनी आग्रह धरला, तेव्हा श्रीमामांनी अगदी मोजक्या लोकांना अनुग्रह दिला. आमच्या श्रीमामांचे कीर्तनच असे होते; तो अनुग्रहच होता. आमचे श्रीमामांचे कीर्तनाला नित्य येणारे अत्यंत श्रद्धावान गृहस्थ श्री. आप्पाराव पवार श्रीमामांचे बद्दल लिहिलेल्या अभंगांपैकी एका अभंगात म्हणतात, 'ऐकतो कीर्तन गोविंदरायांचे । आले माझे वाचे नाम तेणे ।।' ही सारी महाराजांची कृपा आहे.

आणखी एक अत्यंत महत्त्वाची गोष्ट म्हणजे माझे पितृदेव ती.प.पू. श्रीदासराममहाराज यांचा विवाह झाला श्रीक्षेत्र नरसोबा वाडी येथे. त्यांची संध्याकाळी ५ चे सुमारास टांग्यातून वरात निघाली. टांग्यात बसताच श्रीदादांच्या गळ्यातील पुष्पहार कशात तरी अडकून एकदम तुटला. तेव्हा आमचे श्रीदादा त्यांचे परमस्नेही आणि त्यांचेवर नितांत श्रद्धा असणारे श्री. गणपतराव कानिटकर यांना म्हणाले, ''गणपतराव, आत्ता हा हार तुटलाय, तर आता चिमडच्या माईसाहेबमहाराजांनी देह ठेवला आहे.'' सांगलीला आल्यावर हे सारे कळले व श्रीदादांनी त्याचवेळी सांगितलेल्या गोष्टीचे फार मोठे आश्चर्य सर्वांनाच वाटले. श्रीमाईसाहेबमहाराजांनी चिमडच्या मठासाठी जी काही सेवा केली, ती सारी शक्ती माईसाहेबमहाराजांनी माझ्या मातोश्री ती.सौ. सीतावहिनी केळकर यांचेमध्ये संक्रमित केली. श्रीमाईसाहेबमहाराजांचे नावही सीताच होते व चिमडचे महाराजही श्रीरामचंद्रावजीमहाराज! माझे पितृदेव श्रीरामराय केळकर आणि मातोश्री सौ. सीतावहिनी. यावरून या गोष्टीची सत्यता पटते. माझ्या मातोश्री ती.सौ. सीतावहिनी यांनी आमच्या श्रीदादांच्या परमार्थासाठी, साऱ्या केळकर घराण्यासाठी व आमचेकडे येणाऱ्या परमार्थप्रेमी मंडळींसाठी अत्यंत कष्ट घेतले.

या साऱ्या गोष्टींचा विचार करून, प्रा.डॉ. के.वा. आपटे यांनी श्रीसद्गुरू श्रीमाईसाहेबमहाराजांचे जे चरित्र लिहिले आहे, त्याला भगवान श्रीसद्गुरू श्रीनिंबरगीकरमहाराजांचा आशीर्वाद प्राप्त व्हावा, अशी त्यांचे चरणी शतशः प्रार्थना आहे.

भगवान श्रीसद्गुरू तात्यासाहेब कोटणीसमहाराज, ती.प.पू. श्रीसद्गुरू मामामहाराज केळकर, ती.प.पू. श्रीसद्गुरू दासराममहाराज यांचे चरणी अभिवादन करून, हे चार शब्द माझ्या मातोश्री ती.प.पू. सौ. सीतावहिनी केळकर यांचे चरणी अत्यंत नम्रतापूर्वक समर्पण करीत आहे.

हे पुस्तक साकार करण्यामागे ज्या ज्या व्यक्तींचा हातभार लागला आहे, त्या साऱ्या व्यक्तींना धन्यवाद देऊन, त्यांचे ऋण मानून, त्यांचेवर श्रीमहाराजांची सतत कृपा रहावी, अशी श्रीमहाराजांचे चरणी शतशः प्रार्थना!

।। चिमड क्षेत्री सद्गुरू माई । जगदोद्धारा तिष्ठत राही ।।

सांगली<br>
१४/४/२०११<br>
(श्रीनिंबरगीकरमहाराज पुण्यतिथी)

श्रीदादांचा कृपाभिलाषी,<br>
चंद्रशेखर<br>
(चंद्रशेखर रामराय केळकर)

## --- गौरव ---

आपल्या भारत देशात प्रपंच आणि परमार्थ या दोन गोष्टींची सांगड घालून, ज्या स्त्रियांनी परमार्थात परमोच्च स्थान प्राप्त केले, अशा स्त्रियांमध्ये आमच्या प.पू. मातोश्री माईसाहेबमहाराज यरगट्टीकर यांचा समावेश होतो.

प.पू. मातोश्री माईसाहेबमहाराज या रामभाऊमहाराज यरगट्टीकर यांच्या अधिकारसंपन्न पत्नी होत्या. ज्यावेळी माईसाहेबमहाराजांचा विवाह झाला, तेव्हापासून त्यांचा खडतर जीवनाला सुरुवात झाली. ज्या ज्या ठिकाणी रामभाऊमहाराज नोकरीसाठी गेले, त्या त्या ठिकाणी त्या न कुरबूर करता त्यांच्या समवेत गेल्या. विटे या गावी असताना माईसाहेबमहाराजांना रघुनाथप्रिय साधुमहाराज यांचा अनुग्रह प्राप्त झाला व त्यांनी माईसाहेबांना 'प्रपंचात राहूनच परमार्थ करा' असा उपदेश केला. त्यांनी नित्य उपासनेसाठी चांदीच्या पादुकाही त्यांना दिल्या. साधुमहाराजांच्या आज्ञेनुसार व निंबरगीकरमहाराजांच्या संमतीने, रामभाऊमहाराज व माईसाहेबमहाराज हे दोघे चिमडला आले. चिमडला आले असता, त्यांनी स्मशानात एक पर्णकुटी बांधून संसार सुरू केला. स्मशानात ज्या स्त्रीने संसार सुरू केला, त्या स्त्रीची म्हणजेच माईसाहेबांची मानसिक स्थिती काय असेल, याचा थोडा विचार करणे आवश्यक आहे, असे मला वाटते.

भगवद्गीतेत म्हटले आहे :–

सुखदुःखे समे कृत्वा लाभालाभौ जयाजयौ ।<br>
ततो युद्धाय युज्यस्व नैवं पापमवाप्स्यसि ।।२.३८

सुख अथवा दुःख, लाभ अथवा हानी, जय अथवा पराजय याचा विचार न करता, माईसाहेबमहाराजांनी प्रपंचात राहून परमार्थ केला, याला तोड नाही.

माईसाहेबमहाराजांनी आपल्या संपूर्ण आयुष्यात म्हणजे १०३ वर्षांच्या कालखंडात निंबरगीकरमहाराज, साधुमहाराज, आपले पति रामभाऊमहाराज, महायोगिनी लक्ष्मीबाई अक्का, आपले मोठे चिरंजीव दाजीसाहेबमहाराज व कनिष्ठ चिरंजीव उद्धवरावजीमहाराज अशा सर्वांचे निर्याण आपल्या डोळ्यांनी पाहिले. तरी त्या तसूभरही डगमगल्या नाहीत व धीरोदात्त मनाने त्या उभ्या राहिल्या. याचे कारण असे की, त्यांची वृत्ती किंवा मन हे 'समधात' होती. त्यामुळेच हे शक्य झाले. अशा माईसाहेबांनी आपले संपूर्ण आयुष्य चिमड मठाकरिता वेचले.

अशा या महान साध्वी प.पू. माईसाहेबमहाराज यरगट्टीकर यांचे चरित्र प.पू. प्रा.डॉ. के. वा. आपटे तथा आमचे केशवकाका यांनी लिहिले असून, ते अत्यंत रसाळ झाले आहे. या चरित्राचे वाचन केले असता, प.पू. माईसाहेबमहाराज अक्षरशः डोळ्यापुढे उभ्या राहतात. एका सत्पुरुषांनी म्हटले आहे :– 'संतमहात्मे होउनी गेले चरित्र त्यांचे पहा जरा । आपण त्यांच्या समान व्हावे, हाचि सापडे बोध खरा ।।' या चरणात म्हटल्याप्रमाणे, आपण त्यांच्यासमान काही होऊ शकत नाही, परंतु त्यांनी केलेले आचरण अथवा बोध जरी आपल्याला झाला, तरी आपल्या जीवनाचे सार्थक झाल्याशिवाय राहणार नाही.

अशा या महान साध्वी प.पू. माईसाहेबमहाराज यरगट्टीकर यांचे पवित्र चरणी त्रिवार प्रणाम करतो व भगवान सद्गुरु श्रीतात्यासाहेबमहाराज कोटणीस, प.पू. सद्गुरु श्रीनारायणमहाराज यरगट्टीकर, माझे पणजोबा प.पू. सद्गुरु श्रीमामामहाराज केळकर व माझे आजोबा प.पू. सद्गुरु श्रीदासराममहाराज केळकर यांचे चरणी प्रणिपात करतो व येथेच थांबतो.

चैत्र शुद्ध प्रतिपदा (गुढीपाडवा) **– दीपक चंद्रशेखर केळकर**<br>
दि. ४/४/२०११

## --- प्रस्तावना ---

या जगात भारत देश उत्तम आहे असे एका पूर्वीच्या संस्कृत कवीने म्हटले आहे. एके समयी भारत हा इहलौकिक आणि पारमार्थिक या दोन्ही क्षेत्रांत आघाडीवर होता. अध्यात्मशास्त्र हे तर भारतभूमीचे वैशिष्ट्य आहे. भरतखंड हे ईश्वराचे अवतार, धर्म, आणि साक्षात्कारी साधुसंत यांचे आगर आहे. याच भारत देशात अनेक ऋषिमुनि आणि आत्मसाक्षात्कारी साधु होऊन गेले. त्या सर्वांनी परमार्थांची परंपरा प्रज्वलित ठेवली, आणि मानवाच्या जीवनात परमार्थ हा महत्त्वाचा आहे असा घोष केला. चिमडसंप्रदायाचे आद्य सिद्ध आणि भगवान् शंकरस्वरूप असे जे रेवणसिद्ध, त्यांनी म्हटले आहे की भरतभूमीत जन्म प्राप्त झाल्यावर जो कोणी माणूस परमार्थाची पूर्णता साधतो, तो खराखुरा भाग्यवंत ठरतो.

परमार्थमार्गात अथवा अध्यात्मशास्त्रात वैराग्य हे अतिशय महत्त्वाचे गणले गेले आहे. परिणामतः स्त्रीसहवासाच्या त्यागावर भर दिला गेला. याच्याही पुढे जाऊन स्त्री ही पुरुषाच्या परमार्थपथावर अडचण आहे असे म्हटले जाऊ लागले. यावरून असे वाटण्याचा संभव आहे की स्त्री ही परमार्थ करण्याला अधिकारी नाही. पण हे मानणे संपूर्णपणे अयोग्य आहे. तुकाराममहाराजांनी म्हटल्याप्रमाणे ''सकळासी येथे आहे अधिकार.'' याचा अर्थ असा की स्त्रीची इच्छा असेल, तर तीसुद्धा परमार्थातील पूर्णत्व प्राप्त करून घेऊ शकते, ती ब्रम्हवादिनी तसेच ब्रह्मसाक्षात्कारी होऊ शकते, आणि अशा साक्षात्कारी स्त्रियांची उदाहरणे पूर्वीपासून आजतागायत आढळून येतात. असे असले तरी एक गोष्ट स्पष्ट दिसते की संख्येच्या दृष्टीने पाहिल्यास पुरुष संतांपेक्षा स्त्री संतांची संख्या कमी दिसते. अशा स्त्रीसंतांमध्ये महासाध्वी माईसाहेब यरगट्टीकर यांचा समावेश होतो.

या महासंत माईसाहेब यरगट्टीकर या रामभाऊमहाराज यरगट्टीकर ऊर्फ चिमडमहाराज यांच्या पत्नी होत. चिमड महाराजांचे पुत्रपौत्र हे परमार्थात अधिकारसंपन्न होतील असे निंबरगीकरमहाराजांचे वचन होते. चिमडमहाराजांचे पुत्रपौत्र चिमडमठाचे अधिपति झाले. चिमडमहाराजांचे शिष्य ह.पां. ऊर्फ कोटणीसमहाराज, बाबासाहेब मुजुमदार, गोपाळराव कोटणीस, शिवरामबुवा ब्रह्मचारी, गोपाळराव दीक्षित हेही अधिकारसंपन्न सत्पुरुष होते. या सर्व समकालीन संतांच्या गोतावळ्यात माईसाहेबांचे नाव फारसे पुढे आले नाही, यात नवल नाही. ज्या काळी माईसाहेब होत्या त्या काळी नाही म्हटले तरी स्त्रियांचे स्थान हे थोडेफार गौणच होते. त्यामुळे स्त्रीला मान मिळणे हेही तादृश अवघडच होते. आणखी असे :- माईसाहेबांबद्दलची फारशी माहितीही उपलब्ध नाही. अशा प्रतिकूल परिस्थितीत माईसाहेबांचे चरित्र लिहिणे हे चांगलेच अवघड होते. माईसाहेबांचे निर्देश व उल्लेख असणारे ग्रंथ अगदी थोडे आहेत. त्यांच्या आधाराने आणि काही ठिकाणी आनुषंगिक पुराव्याच्या आधारे अनुमाने करून माईसाहेबांचे प्रस्तुत चरित्र हे येथे थोडेफार सुसंगत पद्धतीने मांडलेले आहे.

माईसाहेबांच्या या चरित्रात अनेक चिमड सांप्रदायिकांचा उल्लेख येतो. तो नीट लक्षात यावा म्हणून येथे त्यांची थोडी माहिति प्रथमच दिली आहे :-

चिमड संप्रदायाचे संस्थापक होते रामभाऊमहाराज यरगट्टीकर ऊर्फ चिमडमहाराज. त्यांचे सद्गुरु रघुनाथप्रिय साधुमहाराज हे होते. साधुमहाराजांचे गुरु होते निंबरगीचे नारायणराव भाऊसाहेब ऊर्फ निंबरगीकरमहाराज. निंबरगीकरमहाराजांची लक्ष्मीबाई अक्का ही लाडकी शिष्या होती. ती अधिकारसंपन्न असल्याने तिला महायोगिनी असे म्हटले जाई. चिमडमहाराजांच्या मुख्य शिष्यांचा उल्लेख वर आला आहेच.

अशाप्रकारच्या अधिकारसंपन्न संतांच्या मेळाव्यात माईसाहेबांचे जीवन व्यतीत झाले. साहजिकच ते बरेचसे मागे पडले. त्यांच्या चरित्राचा मागोवा घेण्याचा प्रयत्न या प्रस्तुत ग्रंथात केलेला आहे.

**- के. वा. आपटे**

## उपन्यास

''अहो, ऐकताय काय?''

''होय होय, ऐकतोय मी. बोला, आपणास काय सांगायचे ते.''

''अहो, आपल्या मठात आता भक्तभाविकांचा राबता वाढतच चालला आहे. त्या सर्वांची सोय पहाताना माझा बराच वेळ खर्च होतो. त्यामुळे साधुमहाराजांनी मला सांगितलेले साधन करण्यास फारसा वेळ रहात नाही. मग माझा परमार्थ कसा मार्गी लागणार?''

''माई, आता मी सांगतो ते नीट लक्षात घ्या. तुम्ही म्हणता ते खरेच आहे. आपल्या मठात आता भाविक जन सतत ये-जा करीत असतातच आणि ते तसेच होत रहाणार, आणि त्यांचेकडे लक्ष देण्यास तुमच्याशिवाय येथे आहे तरी कोण? ते काम तुम्हालाच करावे लागणार. उरलेल्या वेळात तुम्ही जमेल तसे साधन करा. आणखी एक समजून घ्या. माझे मत असे आहे :- परमार्थ करण्याऱ्या माणसांना जे कोणी साहाय्य करतात तेसुद्धा परमार्थच करतात. तेव्हा आपल्याकडे येणाऱ्या पारमार्थिकांसाठी तुम्ही जे कराल ते तुमच्या परमार्थातच गणले जाईल याची खात्री बाळगा. काळजी करू नका. मग जो काही वेळ उरेल तो वेळ साधनात घालवा. मी तुम्हाला खात्री देतो की तुमचा परमार्थ पूर्ण होईल.''

माईसाहेब व त्यांचे पति चिमडमहाराज यांच्यामध्ये वरील संवाद झाला. माईसाहेबांनी आपल्या पतीचे वचन तंतोतंत पाळले. आणि चिमडमहाराजांच्या आश्वासनाप्रमाणे माईसाहेब परमार्थात पूर्ण अधिकारी झाल्या.

■■■

## प्रकरण पहिले

भारत देशाची भूमी ही अनेक राज्यांत विभागलेली आहे. या विभागांमध्ये महाराष्ट्र हे एक राज्य आहे. महाराष्ट्रातील सातारा नावाच्या जिल्ह्यामध्ये खानापूर बलवडी या नावाचे एक छोटेसे खेडेगांव होते. या गावात बचारामपंत आणि येसूबाई नावे असणारे एक पति-पत्नीचे जोडपे रहात होते. ते दोघेही सात्त्विक स्वभावाचे होते. या दांपत्याला इ.स. १८३९ साली एक कन्यारत्न झाले. ही कन्या म्हणजेच माई अथवा माईसाहेब होत.

पूर्वीच्या काळातल्याप्रमाणे बाल माई आपल्या मैत्रिणींच्या संगतीत भातुकली, झब्बापाणी इत्यादि खेळ खेळत होती. हळुहळु ती वयाने वाढत गेली. त्या काळी मुलामुलींचे विवाह अगदी बालपणी होत असत. ही गोष्ट लक्षात घेऊन, माईच्या आई येसूबाई यांनी माईच्या लहान वयातच तिला बरेचसे घरकाम शिकवले. माई त्या कामात तरबेज झाली. कालक्रमाने माईला आठवे वर्ष लागले. माई आता लग्नाला योग्य झाली आहे असे समजून माईच्या आईवडिलांनी तिचे लग्न करून देण्याचे ठरविले.

### माईसाहेबांचा विवाह

माईसाठी वर संशोधन करीत असताना तिच्या मातापित्यांना माईला योग्य असा वर आढळून आला. तो म्हणजे रामचंद्रराव/रामभाऊ यरगट्टीकर. यावेळी रामचंद्राचे वय चौदा वर्षांचे होते. माईसाहेबांच्या आठव्या वर्षीच त्यांच्या आईवडिलांनी त्यांचा विवाह चौदा वर्षांच्या रामभाऊंशी इ.स. १८४७ साली लावून दिला. यावेळी रामचंद्ररावांचे शिक्षणही पूर्ण झालेले नव्हते. माईसाहेबांचे पति रामचंद्रराव हेच पुढे रामभाऊमहाराज, रामचंद्रमहाराज, चिमडमहाराज इत्यादि अनेक नावांनी प्रसिद्ध झाले आणि त्यांनीच चिमड संप्रदाय सुरू केला.

### रामचंद्ररावांचे घराणे

रामचंद्ररावांचे मूळ आडनाव यरगट्टीकर असे नव्हते. त्यांच्या कुळाचे मूळ नाव ''हुद्दार'' असे होते. हे हुद्दार घराणे मूलतः सांगली या गावाजवळील मिरज या ऐतिहासिक स्थळाचे रहिवासी होते. या कुटुंबाचे मूळ पुरुष महादेव या नावाचे होते. त्यांना सखाराम या नावाचा एकच मुलगा होता. या सखारामाला त्रिंबक आणि

आप्पाजी असे दोन पुत्र होते. आप्पाजी निपुत्रिक असल्याने त्यांचा वंश पुढे चालू राहिला नाही. त्रिंबकला आबाजीपंत, अंताजीपंत, बाळकृष्णपंत आणि लक्ष्मणराव असे चार चिरंजीव होते. या चार मुलांपैकी आबाजीपंत आणि अंताजीपंत हे दोघे बंधु आपले मिरज हे गाव सोडून देऊन, यरगट्टी नावाच्या गावी रहाण्यास गेले. यरगट्टी हे गाव कर्नाटक राज्यात होते. बेळगाव जिल्ह्यात परसगड नावाचा तालुका होता. त्या तालुक्यातील मुरगोड नावाच्या महालात यरगट्टी गाव होते.

## हुद्दार ऐवजी यरगट्टीकर

आबाजीपंत आणि अंताजीपंत यांना मिरज सोडण्यास काय कारणे झाली हे ज्ञात नाही. पण एक खरे की त्यांनी मिरजेबरोबर आपले हुद्दार या नावाचाही त्याग केला. आणि ज्या यरगट्टी गावी ते रहावयास आले होते, त्या ग्रामनामावरून तयार होणारे यरगट्टीकर हे नवीन आडनाव त्यांनी धारण केले आणि तेच पुढेही चालू ठेवले.

## यरगट्टीकर घराणे

यरगट्टीकर हे घराणे ब्राह्मण होते. त्यांचे गोत्र भारद्वाज असून सूत्र आश्वलायन होते. बनशंकरी ही कुलदेवता होती. या घराण्यात भगवान् शंकराची उपासना प्रचलित होती. हे कुटुंब रामदासी पंथाचे होते. साहजिकच प्रतिवर्षी समर्थ रामदासस्वामींच्या सज्जनगडावर जाऊन रामदासस्वामींच्या समाधीचे दर्शन घेणे हा परिपाठ होता. तसेच रामदासस्वामींच्या दासबोध या ग्रंथराजाचे पठणही या कुळात चालू होते. पुढे एकदा रामभाऊ सज्जनगडावर गेले असता, त्यांना समर्थ रामदासस्वामींनी साक्षात् प्रगट होऊन दासबोधाची एक प्रत दिली, हे येथेच नमूद करावयास हरकत नाही.

## अंताजीपंतांचे पत्र

यरगट्टी गावात रहाण्यास आलेले अंताजीपंत हे वकिलीचा व्यवसाय करीत. त्यांच्या पत्नीचे नाव कृष्णा असे होते. या सौ. कृष्णाबाईपासून अंताजीपंतांना त्रिंबक आणि रामचंद्र या नावाचे दोन पुत्र झाले. त्यांतील त्रिंबक हा पुढे आपल्या चुलत्याला दत्तक गेला. उरला रामचंद्र. आणि हा रामचंद्रच माईसाहेबांचा पति म्हणून निवडला गेला होता.

## रामचंद्राचे जनन, शिक्षण, नोकरी

रामचंद्रचा जन्म ज्येष्ठ शुद्ध १०, शके १७७५ (इ.स. १८३३) या दिवशी झाला



होता. त्याचे जन्मनाव योगेश्वर असे होते. पुढे बारश्याच्या दिवशी या मुलाचे नाव रामचंद्र असे ठेवण्यात आले. मोठेपणी त्यांना रामभाऊ अथवा रामचंद्रराव असे म्हणू लागले. त्यानंतर जेव्हा त्यांना परमार्थातील अधिकार प्राप्त झाला तेव्हा ते रामचंद्रमहाराज, रामभाऊमहाराज म्हणून ओळखले जाऊ लागले. आणि नंतर ते चिमड गावी राहू लागल्याने त्यांना चिमडमहाराज असे नाव प्राप्त झाले.

रामचंद्रला आठवे वर्ष लागताच, त्याचा उपनयन संस्कार झाला. त्यानंतर वयाच्या दहाव्या वर्षापर्यंत त्याचे बालपण यरगट्टी गावातच गेले. पुढे त्याचे वडिल अंताजीपंत हे वकिलीच्या व्यवसायासाठी यरगट्टी हे गाव सोडून देऊन, महाराष्ट्रात सातारा जिल्ह्यातील खानापूर या गावी रहाण्यास आले. तेव्हा वयाच्या अकराव्या वर्षी रामचंद्रराव शिक्षणासाठी वडिलांजवळ खानापूर गावी रहाण्यास आले. त्यांचे शिक्षण चालू असतानाच, ते माईसाहेबांच्या आईवडिलांच्या आढळात आले आणि पसंत पडले. वयाच्या चौदाव्या वर्षी रामचंद्राचा माईसाहेबांशी विवाह झाला. साहजिकच माईसाहेब माहेर सोडून सासरी खानापूर गावी रहाण्यास आल्या. उंबरठ्यावरील मापाला धक्का देऊन त्यांनी सासरच्या घरात प्रवेश केला. सासरी त्यांचे नाव सीता असे ठेवण्यात आले. तथापि माई किंवा माईसाहेब हेच त्यांचे घरगुती नाव प्रचारात राहिले.

रामचंद्रराव हे इ.स. १८५७ मध्ये त्या काळची मुलकी परीक्षा उत्तीर्ण झाले. लगेच त्यांना सातारा येथे सबॉर्डिनेट जज्जच्या कोर्टात कारकून म्हणून नोकरी मिळाली. तेव्हा माईसाहेब पत्नीला घेऊन रामभाऊ सातारा येथे गेले आणि बिऱ्हाड करून राहू लागले. सातारा येथील नोकरीत पगार कमी होता. म्हणून त्यांनी ती नोकरी सोडून दिली आणि विटे नावाच्या गावी नवीन नोकरी पत्करली. तेव्हा माईसाहेबांनी विटे गावी बिऱ्हाड केले. या विटे गावी असतानाच रामचंद्ररावांच्या जीवनात पुढील प्रसंग घडला.

## प्राणसंकट

एके दिवशी रामचंद्रराव आपल्या घरी झोपलेले होते. मध्यरात्रीची वेळ झाली होती. त्यांच्या बिछान्याच्या वरचे भागी आढ्यातून एक भला मोठा काळाकुट्ट नाग रामचंद्ररावांना डसण्यास खाली लोंकबळू लागला होता. अचानक तेथे निंबरगीकरमहाराज साक्षात् प्रगट झाले आणि हाका मारून त्यांनी रामभाऊंना जागे केले. मिणमिणत्या दिव्याच्या प्रकाशात रामचंद्ररावांना खांद्यावर घोंगडी असणारा एक उंचापुरा पुरुष दिसला. पण त्याची भीति मात्र रामभाऊंना वाटली नाही. बिछान्यावरून बाजूस येण्यास

रामभाऊंना सांगून, तो पुरुष त्यांना म्हणाला, ''रामभाऊ, तो पहा तुम्हाला दंश करण्यास येणारा नाग. तुम्हाला मी उठवल्याने तुमचा आत्ताचा अपमृत्यु टळला आहे. केवळ प्रपंच करणे हे जीवनाचे ध्येय मानू नका. जग निर्माण करणाऱ्या परमात्म्याची प्राप्ति करून घेऊन जीवन्मुक्त होणे हे मानवी जीवनाचे साध्य आहे. हे लक्षात घेऊन तुम्ही आता परमार्थाच्या मार्गाला लागा.'' इतके बोलून तो पुरुष तिथल्या तिथे अदृश्य झाला. नंतर रामभाऊंच्या हाकांनी जागे झालेले लोक तेथे आले. तेव्हा तो नाग फुसफुस् करीत खोलीच्या बाहेर पडून अदृश्य झाला. घडलेला सर्व प्रसंग रामभाऊंनी इतरांना सांगितला. त्या सर्वांना फार आश्चर्य वाटले. आपल्या पतीचा अपमृत्यु टळला याबद्दल माईसाहेबांना आनंद झाला आणि त्यांनी देवाचे उपकार मानले.

या प्रसंगापासून रामभाऊंच्या मनात विचार येऊ लागले :- सर्पदंशापासून आपणास बचावणारा तो महात्मा पुरुष कोण होता? त्याचे नाव काय? तो पुनः मला भेटेल काय? त्या पुरुषाच्या सांगण्याप्रमाणे मी आता परमार्थाला लागेन, पण परमार्थाचे मार्गदर्शन मला कोण करेल? इत्यादि प्रश्न त्यांच्या मनात घोळत. पुढे योग्य वेळी त्यांना या प्रश्नांची उत्तरे मिळाली.

## साधुमहाराजांचा उपदेशानुग्रह

विटे गावातील नोकरीत मिळणारा पगार अपुरा असल्यामुळे रामभाऊंनी ती नोकरी सोडून दिली. आणि तत्काळी विद्यमान असणाऱ्या जत नावाच्या संस्थानात नवीन सेवा पत्करली. साहजिकच माईसाहेबांना आता जत या गावी बिऱ्हाड थाटावे लागले. या नवीन नोकरीच्या निमित्ताने रामभाऊंना जत संस्थानात असणाऱ्या उमदी नावाच्या गावी जावे लागत असे. त्यावेळी उमदी गावातील एका मारुतीच्या देवळात रघुनाथप्रिय साधुमहाराज ऊर्फ साधुमहाराज हे रहात होते. ते निंबरगी गावच्या निंबरगीकरमहाराजांचे पट्टशिष्य होते. आणि आपल्या गुरूच्या सांगण्यानुसार, ते गावोगावी फिरत असत. अशा भटकंतीतच ते उमदी गावी मुक्काम करून होते. ते साधु म्हणून लोकांना ज्ञात होते. उमदीस गेल्यावेळी रामभाऊ साधुमहाराजांच्या दर्शनास जात असत. त्यांचेकडून उपदेशानुग्रह घेऊन परमार्थास लागावे असे रामभाऊंना वाटू लागले. त्याप्रमाणे त्यांनी साधुमहाराजांना परमार्थाचा उपदेश देण्यासाठी प्रार्थना केली. तेव्हा साधुमहाराज त्यांना म्हणाले ''रामभाऊ, आपण दोघेही निंबरगीस माझ्या गुरूकडे जाऊ. आणि मग ते सांगतील त्याप्रमाणे करू.'' ते मान्य करून एकदा रामभाऊ साधुमहाराजांबरोबर निंबरगीस



गेले. तेथे निंबरगीकरमहाराजांना पहाताच, आपणास सर्पदंशातून बचावणारे हेच ते महापुरुष, असे रामभाऊंच्या लक्षात आले. त्यांनी धावत जाऊन निंबरगीकरमहाराजांच्या पायाला मिठी मारली. त्यांना उठवून निंबरगीकरमहाराजांनी त्यांचे कुशल विचारले आणि प्रश्न केला, ''अहो, रामभाऊ, तुम्ही परमार्थाला लागला की नाही?'' ''परमार्थासाठीच मी आलो आहे,'' ''असे रामभाऊंनी उत्तर दिले. तेव्हा निंबरगीकरमहाराज साधुमहाराजांना म्हणाले,'' साधुबुवा, हे रामभाऊ परमार्थास पात्र आहेत. तुम्ही यांना आपला परमार्थाचा साधनमार्ग सांगा.'' गुरूच्या आज्ञेप्रमाणे साधुमहाराजांनी तिथेच रामभाऊंना उपदेशानुग्रह केला. साधुमहाराजांचा अनुग्रह झाल्यावर निंबरगीकरमहाराजांनी रामभाऊंना परमार्थ करताना प्रपंचात कसे रहावे याचा उपदेश केला. त्यांनी सांगितले : ''प्रपंचात आपणास जे प्राप्त झाले आहे त्यातच समाधान मानून संतोषाने रहावे. इतर लोकांच्या गोष्टींचा हव्यास करू नये. परधन, परस्त्री आणि परक्याचे घरदार इत्यादींची अभिलाषा करू नये.

''आपल्या आई बापांना सुख द्यावे. आपल्या बायकामुलांचा यथायोग्य सांभाळ करावा. परंतु त्यांच्या झपाट्यात सापडू नये. त्यांच्या झपाट्यात सापडल्यास त्यांची सुखदुःखे आपणांस भोगावी लागतात.

''दुसऱ्याचे वाईट व्हावे अशी इच्छा कधीही करू नये. दुसऱ्याचे चांगले व्हावे अशीच इच्छा करावी. अवगुण टाकून अंगी सद्गुण बाणवण्याचा प्रयत्न करावा. सद्गुणांच्या योगे संसारात सुख मिळून परमार्थाचा लाभ होतो. खोटे बोलणे टाळावे. इतरांवर अन्याय करू नये. कोणत्याही गोष्टीचा अहंकार करू नये. ज्या गोष्टीविषयी अहंकार येतो ती गोष्ट नष्ट होते. काम, क्रोध इत्यादि सहा विकार हे आपले वैरी आहेत. त्यांच्या ताब्यात जाऊ नये. त्यातील एकाला जरी थारा दिला तरी इतर सर्वजण मुक्कामास येतात.

''नेहमी खरे बोलत जावे. सदाचाराने वागत रहावे. प्रपंच करताना परमार्थाकडे दुर्लक्ष करू नये. गुरूंनी सांगितलेले साधन नियमितपणे करीत जावे. साधन साधले की आत्मसाक्षात्कार होऊन जीवनाचे सार्थक होते.''

## नोकरीत पुनः बदल

साधुमहाराजांचा अनुग्रह आणि निंबरगीकरमहाराजांचा उपदेश प्राप्त झाल्यावर रामभाऊ उमदीस परत आले. त्यानंतर त्यांनी झालेला सर्व प्रकार माईसाहेबांना सांगितला.

माईसाहेबांनाही आनंद झाला.

याचवेळी रामभाऊंनी ठरविले की यापुढे दरवर्षी पौष महिन्यात सहकुटुंब निंबरगीस जाऊन निंबरगीकरमहाराजांचे दर्शन घ्यावयाचे. निंबरगीकरमहाराज विद्यमान असेपर्यंत त्यांनी हा प्रघात चालू ठेवला. काही काळ गेल्यानंतर रामभाऊंनी जत संस्थानातील सेवा सोडली आणि सातारा जिल्ह्यातील मायणी गावच्या सब् कोर्टात त्यांनी नोकरी पत्करली. पण पुढे हीही नोकरी त्यांना मानवेनाशी झाली. तेव्हा रामभाऊंनी पुनः विटे गावी नोकरी धरली. आता विटे गावी रामभाऊंच्या बिऱ्हाडाचे बस्तान बसले.

## दुष्काळातील निंबरगीची वारी

विटे येथे रामभाऊंची नोकरी व्यवस्थित चालू होती व त्यांची निंबरगीची वारीही चालू होती. इ.स. १८७५ सालचे सुमारास दुष्काळ पडला होता. वाटेवर चोऱ्यामाऱ्या वाढल्या. तशात पौष महिना आला. यावेळी निंबरगीस जावे की नाही असा रामभाऊंना प्रश्न पडला. त्यावेळी त्यांना स्वप्नात दृष्टांत झाला. त्यानुसार माईसाहेबांना घेऊन ते वारीस निघाले. वाटेवर खानापूर गावी त्यांच्या मातोश्री होत्या. त्यांनाही दृष्टांत झाला होता. रामभाऊंनी मातोश्रींनाही आपल्या बरोबर घेतले आणि ते निंबरगीच्या वाटेला लागले. वाटेवर गोमेवाडी नावाच्या गावाजवळ एका ओढ्याचे काठी सर्वजण पोचले. तो ओढा जरी कोरडा ठणठणीत पडला होता, तरी त्याच्या पात्रात एके ठिकाणी पाणी व हिरवळ या यात्रेकरूना दिसली. तेव्हा तेथे स्नान व भोजन करून मंडळी पुढील वाटेला लागली. वाटेत रामभाऊंच्या मनात विचार आला : कोरड्या पडलेल्या ओढ्यामध्ये पाणी आणि हिरवळ कोठून आली? त्यांनी मागे वळून पाहिले. त्यावेळी ओढ्याच्या पात्रात पाणीही नव्हते आणि हिरवळही नव्हती. तेव्हा रामभाऊंच्या लक्षात आले की निंबरगीकरमहाराजांच्या सामर्थ्याने तसे झाले होते. निंबरगीकरमहाराजांचे उपकार स्मरत रामभाऊ सर्व मंडळींसह निंबरगीस पोचले आणि निंबरगीकरमहाराजांचे दर्शन घेऊन सुखरूपपणे विट्याला परत आले.

## माईसाहेबांना साधुमहाराजांचा अनुग्रह

विटे येथे परत आल्यावर रामभाऊ व माईसाहेब यांचे दैनंदिन जीवन सुरू झाले. या काळात माईसाहेबांनी एका मुलीस जन्म दिला. तिचे नाव देवका असे ठेवण्यात आले. इ.स. १८७८ चे प्रारंभी साधुमहाराज आपल्या भ्रमंतीच्या काळात विटे येथे रामभाऊंचे



घरी आले. ते तेथे असतानाच माईसाहेब प्रसूत होऊन त्यांना मुलगा झाला. त्या काळी अनुभवी सुईणीच स्त्रियांचे बाळंतपण करीत. पण यावेळी मुलाचे नालच्छेदन व्यवस्थित न झाल्याने तो मुलगा निवर्तला. तेव्हा लोक साधुमहाराजांना नावे ठेवू लागले : ''असले कसले हे अपशकुनी साधु!'' असले शब्द कानांवर येताच साधुमहाराज माईसाहेबांना म्हणाले, ''सीतामाई, शोक करू नका. प्रारब्ध कर्मानुसार त्या मुलाचे आयुष्य अल्प होते. तेव्हा खेद सोडा. आणि मी सांगतो ते लक्षात ठेवा. यानंतर तुम्हाला आणखी मुले व मुली होतील. काळजी करू नका. आणि यानंतर काही काळाने मी तुमच्या जवळच वास्तव्यास येईन.'' साधुमहाराजांचे हे वचन भविष्यकालीन घटनांचे सूचक होते. पुढे रामभाऊ चिमडास जाणार, बरोबर माईसाहेब असणार, तेथे रामभाऊंच्या निवासस्थानाजवळ साधुमहाराजांची समाधि होणार इत्यादीच्या खुणा साधुमहाराजांच्या वचनात होत्या. आणि पुढे तसेच घडले.

साधुमहाराजांनी पूर्वी आपल्या पतीला अनुग्रह दिला होता. तसाच आता आपणासही मिळावा असे माईसाहेबांना वाटू लागले. पतीला विचारून, मग त्यांनी साधुमहाराजांना विनंति केली. त्यांच्या विनंतीप्रमाणे साधुमहाराजांनी माईसाहेबांना उपदेशानुग्रह केला. त्यानंतर ते माईसाहेबांना म्हणाले, ''सीतामाई, माझे गुरु निंबरगीकरमहाराज प्रापंचिकांना जो उपदेश करीत, त्यातील काही भाग मी तुम्हाला सांगतो. तो लक्षात ठेऊन तुम्ही त्याप्रमाणे वागा.'' ''ठीक आहे,'' असे माईसाहेब बोलल्या. तेव्हा साधुमहाराजांनी सांगण्यास सुरुवात केली :-

''प्रपंचात राहूनच परमार्थ करावा. प्रपंचात आपणास पति, पुत्र, पौत्र, अन्य नातेवाईक असतात. त्यांचेशी आपण प्रेमाने वागावे. पण त्यांच्यामध्ये आसक्त होऊ नये. कारण आसक्ति आणि अहंकार हे आपणास जन्म-मरणाच्या फेऱ्यांत पाडणारे आहेत. देवाने आपणास जे दिले आहे त्यांतच तृप्त राहून समाधानाने जीवन कंठावे. कसलीही काळजी करू नये. कारण माणसाच्या काळजीने काही होत नाही. काळजी करणाऱ्याच्या मनाला मात्र कष्ट होतात.

''आपण इतरांना कोणत्याही प्रकारे उपद्रव देऊ नये, इतरांचे मन खिन्न करू नये. होईल तितका परोपकार करावा पण तसे करताना आपण संकटात सापडणार नाही याची खबरदारी घ्यावी. आपण कुणाशीही कपटाने आणि कठोरपणाने वागू नये. मनामध्ये क्रोध, द्वेष इत्यादींना थारा देऊ नये. आपण इतरांशी जसे वागू तसे दुसरेही आपल्याशी

वागतात हे लक्षात ठेवावे. आपले वर्तन चांगले असेल तर कधीही दुखणे येणार नाही. म्हणून आपली वर्तणूक जपावी. आपण चांगल्या रीतीने वागलो तर आपण म्हातारे होऊन मरू. म्हणून आपली वर्तणूक सांभाळावी. आपली वर्तणूक चांगली असेल तर ब्रह्मा, विष्णु आणि महेश यांतील कोणीही आपले वाईट करू शकणार नाही.

''दुसऱ्यांची मुलेबाळे आणि आपली मुलेबाळे यांत भेदभाव, कमीजास्तपणा करू नये. मुलामुलांत भांडणे झाल्यास, आपल्या मुलांचे ऐकून इतरांच्या मुलांना शिक्षा करू नये.

''नेहमी खरे बोलावे. आपण खरे बोलत गेलो तर आपण बोललेले सर्वच खरे होते.

''आळस हा प्रपंच आणि परमार्थ या दोहोंतही घातक आहे. म्हणून आळशीपणा करू नये. आळसाला तिळमात्रही थारा देऊ नये. आळस टाकून देऊन, आपण आपले कर्तव्य कर्म करीत रहावे.

''अशाप्रकारे विवेकाने प्रपंच करावा. पण केवळ प्रपंचातच गुंतून आणि रमून जाऊ नये. प्रपंच करीत असतानाच गुरूंनी सांगितलेले नाम घेत असावे. प्रपंच करीत असताना आत्म्याकडे लक्ष ठेवण्याचा प्रयत्न करावा. तसे केल्याने आपले कल्याण होणार आहे आणि जीवनाचे सार्थक होणार आहे.''

माईसाहेबांना असा यथोचित उपदेश केल्यावर, साधुमहाराजांनी माईसाहेबांच्या बाह्य नित्य उपासनेसाठी त्यांना चांदीच्या पादुका दिल्या. त्या पादुका मस्तकी धारण करून माईसाहेबांनी त्यांचा स्वीकार केला. त्यानंतर त्या पादुकांची दैनंदिन पूजा करण्याचे व्रत त्यांनी स्वीकारले. तसेच साधुमहाराजांनी केलेला उपदेश मनात बाळगून तसे त्या वागू लागल्या.

## साधुमहाराजांचे निर्याण

विटे येथे रामभाऊ व माईसाहेब यांचा निरोप घेऊन साधुमहाराज परत निघाले ते थेट चिमडास आले. त्यांनी इ.स. १८७८ साली देह ठेवण्याचा विचार केला आणि तसे आपल्या भक्त मंडळींना सांगितले. भक्तांना त्यांच्या विरहाच्या कल्पनेने दुःख झाले. तेव्हा अगदी नम्रपणाने व कळकळीने त्यांनी साधुमहाराजांची प्रार्थना केली, ''महाराज, आपण इतक्यात आम्हांस सोडून जाऊ नये.'' भक्तांनी फारच आग्रह धरला. त्यांचा भाव पाहून कोमल मनाच्या साधुमहाराजांचे मन विरघळले. ते म्हणाले, ''सज्जनहो,



तुमच्या आग्रहाप्रमाणे मी या वर्षी देह ठेवण्याचा माझा बेत रहित करतो. पण एक लक्षात ठेवा. या पुढे काही झाले तरी मी पुढच्या वर्षी देह ठेवणारच. त्यावेळी आग्रह झाला तरी मी कुणाचे ऐकणार नाही.''

यथाक्रमाने इ.स. १८७९ साल आले. यावेळी चिमड गावी गुराप्पा औरसंग या भक्ताच्या घरी मुक्काम असताना इ.स.१८७९ च्या चैत्र महिन्यात साधुमहाराजांनी निर्वाण केले. तत्पूर्वी त्यांच्या भक्तांनी त्यांना विचारले होते, ''महाराज, आपण गेल्यावर आम्ही कुणाकडे पहावे? आम्हाला कोण मार्गदर्शन करेल?'' त्यावर उत्तरादाखल साधुमहाराज म्हणाले, ''सज्जनहो, ऐका. माझे एक अधिकारसंपन्न शिष्य रामभाऊ यरगट्टीकर हे सध्या विटे या गावी रहात आहेत. मी गेल्यानंतर तुम्ही लोक त्यांचेकडे जा, आणि त्यांना येथे चिमडला घेऊन या. त्यांची रहाण्याची व्यवस्था करा.'' साधुमहाराजांच्या या वचनाला अनुसरून, साधुमहाराजांनी निर्याण केल्यावर, महालिंगपूर व चिमड येथील काही भक्त लोक विटे येथे गेले, आणि रामभाऊंची भेट घेऊन, त्यांनी साधुमहाराजांचे वचन त्यांना सांगितले आणि चिमडास येण्याची विनंति केली. ताबडतोब निर्णय देणे हे रामभाऊंना शक्य नव्हते. तेव्हा, विचार करून काय ते सांगतो, असे रामभाऊ त्यांना म्हणाले. आपले पति काय ठरवितात याची प्रतीक्षा माईसाहेब करू लागल्या.

## चिमडास प्रस्थान

साधुमहाराजांच्या निर्याणानंतर, इ.स. १८७९ साली, रामभाऊ हे नेहमीप्रमाणे पौष महिन्यात निंबरगीला गेले. निंबरगीकरमहाराजांचे दर्शन घेऊन झाल्यावर, त्यांनी साधुमहाराजांच्या भक्तांनी सांगितलेले साधुमहाराजांचे वचन निंबरगीकरमहाराजांना कथन केले. तेव्हा निंबरगीकरमहाराज म्हणाले, ''रामभाऊ, साधुमहाराजांचे वचन मला योग्य वाटते. तुम्ही त्यांच्या वचनाप्रमाणे वागा.'' तेव्हा साधुमहाराज आणि निंबरगीकरमहाराज यांच्या इच्छेप्रमाणे वागण्याचे ठरवून रामभाऊ विटे येथे परत आले. आल्या आल्या त्यांनी आपला बेत माईसाहेबांच्या कानावर घातला. माईसाहेब प्रथम बुचकळ्यातच पडल्या. 'इथली चांगली नोकरी सोडून चिमडसारख्या अंपरिचित स्थळी जाऊन काय करायचे? तेथे आपले काय आणि कसे होणार?' या विचारांचे जोडीने ताबडतोब त्यांच्या मनात दुसरे विचार आले. आपले गुरु साधुमहाराज, त्यांचे गुरु निंबरगीकरमहाराज आणि आपले पति या सर्वांची इच्छा आपण चिमडास जावे अशी असेल तर आपण कशाला आडकाठी आणावी? गुरुजनांची आज्ञा मोडायची नसते.

आणि सर्व काही ईश्वरेच्छेने घडते असे साधुमहाराजांनी सांगितले आहेच. हे सर्व विचार माईसाहेबांच्या मनात आले आणि त्यांनी लगेच निर्णय घेऊन चिमडला जाण्याच्या पतीच्या बेतास त्यांनी तत्काळ संमति दिली. ती मिळताच आपल्या निर्वाहाचे साधन असणारी नोकरी रामभाऊंनी सोडली आणि त्यांनी चिमडला जाण्यास प्रस्थान ठेवले.

**चिमडास गमन**

विट्यातील नोकरीचे त्यागपत्र देऊन आणि विट्यातील अन्य व्यवहार आटोपून, इ.स. १८८० साली रामभाऊ चिमडास पोचले. आता आपण त्यांना चिमडमहाराज म्हणायला लागू या.

त्या काळी चिमड हे कर्नाटकातील एक फुटके खेडे होते. तेरदाळपासून महालिंगपूरच्या अलीकडे तीन मैलांवर चिमड गाव होते. जुन्या काळी सदर्न मराठा (सध्याची साऊथ सेंट्रल) रेल्वेच्या कुडची स्टेशनवर उतरून प्रथम तेरदळला जावे लागे. कुडचीहून तेरदाळ १६ मैल, तेथून रबकवी ४ मैल, आणि तेथून चिमड ३ मैल असे हे प्रवासाचे टप्पे असत. त्या काळी हा सर्व प्रवास पायी अथवा बैलगाडीने करवा लागे. साहजिकच प्रवास करण्यात बरेच तास मोडत असत.

या चिमड गावी तसे नाव घेण्यासारखे अन्य काही नव्हतेच. कलाकौशल्य, व्यापार, शिक्षण वा अन्य काही उद्योग या कोणत्याच दृष्टीने चिमडास काहीच नव्हते. सृष्टिसौंदर्य म्हणावे तर तेही नव्हते. अशा या चिमड गावी चिमडमहाराज रहाण्यास आले.

चिमड गावाच्या पूर्व/आग्नेय दिशेला एक ओढा होता. ओढ्याचे पलीकडे पूर्वी वापरात असणारे पण सध्या पडीक असणारे एक स्मशान होते. ती जागा चिमडच्या मंडळीनी चिमडमहाराजांना वास्तव्यास मुक्रर केली. या जागेचे एक महत्त्वाचे वैशिष्ट्य चिमडमहाराजांना माहीत होते. म्हणून त्यांनी ती जागा मान्य केली. हे वैशिष्ट्य असे होते :–

पूर्वी एकदा निंबरगीकरमहाराज हे लक्ष्मीबाई अक्कासह फिरत फिरत चिमड या गावाजवळील या ओसाड पडलेल्या स्मशानात आले होते. त्या जागेचे भावी महत्त्व भविष्यदर्शी निंबरगीकरमहाराजांना कळले. म्हणून त्यांनी त्या जागेवर कापूर लावला. मग ते लक्ष्मीबाई अक्कांना म्हणाले, ‘‘अक्का, तूही आता तुझ्या हाताने यात कापूर



घाल.’’ तेव्हा लक्ष्मीबाई अक्का निंबरगीकरमहाराजांना म्हणाल्या, ‘‘महाराज, तुम्ही कापूर लावल्यावर मी पुनः कशास कापूर टाकावयास हवा? आणि महाराज, तुम्ही तरी या ओसाड जागेवर कशासाठी कापूर लावला?’’ तेव्हा निंबरगीकरमहाराज बोलले, ‘‘अक्का, तू प्रथम कापूर घाल. मग तुला सांगतो.’’ महाराजांच्या सूचनेप्रमाणे लक्ष्मीबाई अक्कांनी कापूर घातल्यावर, निंबरगीकरमहाराजांनी खुलासा केला :– ‘‘अक्का, आज ही स्मशानाची जागा ओसाड व पडीक आहे. परंतु आणखी काही काळानंतर या जागेला ऊर्जितावस्था आणि महत्त्व येणार आहे. येथेच एका साधुपुरुषाचे मंदिर होणार आहे आणि त्याच्या शेजारीच अन्य साधूचा मठ होणार आहे. अक्का, आणखी एक लक्षात ठेव. मी या जगातून निघून गेल्यावर तुलासुद्धा येथील मठात रहावयास यावे लागणार आहे.’’ असे सांगून निंबरगीकरमहाराजांनी त्या स्मशानातील काही भाग रेखांकित केला. असा हा सर्व वृत्तांत लक्ष्मीबाई अक्कांच्या तोंडून पूर्वीच चिमडमहाराजांना कळलेला होता. म्हणून त्यांनी कोणतीही कुरकुर न करता आणि कोणताही आक्षेप न घेता, चिमडच्या भक्तांनी देऊ केलेली स्मशानातील जागा आपली पर्णकुटी बांधण्यास मान्य केली. आणि चिमडमहाराज त्या पर्णकुटीत रहाण्यास आले. रामायणातील सीतेने पतीबरोबर वनवास पत्करला. आधुनिक काळात आधुनिक सीतेने पति रामाबरोबर स्मशानवास पत्करला. चिमडमहाराज जेव्हा त्या पर्णकुटीत रहाण्यास आले त्यावेळी त्यांच्या बरोबर पत्नी माईसाहेब, लहान मुलगी देवका, आणि बसपराप्पा मुत्तुर नावाचा एक विश्वासू सेवक इतकाच परिवार होता.

■■■

**श्लोक**

गुरू सांप्रदायासी जी धन्य माता ।
जगी धन्य सीता महा रामकांता ।
गुरूनामी आल्या तदाकारतेला ।
नमस्कार साष्टांग त्या माऊलीला ।।१।।

श्रीदासराममहाराज केळकर, सांगली

# प्रकरण दुसरे

चिमडच्या पूर्वीच्या स्मशानातील जागेवर चिमडच्या मंडळींनी बांधून दिलेल्या पर्णकुटीत चिमडमहाराज राहू लागले.

**दाजीसाहेबांचे जनन**

चिमडमहाराजांचा परिवार तेथे राहू लागल्यावर काही दिवसातच माईसाहेब प्रसूत झाल्या आणि त्यांना इ.स. १८८० साली एक मुलगा झाला. त्याचा जन्म होताच त्या बाळंतिणीच्या खोलीत प्रकाश पडला होता. उपजताच या मुलाच्या डोक्यावर जे केस होते ते एकाद्या जटाधारी तपस्वी पुरुषाच्या केसांप्रमाणे भरपूर आणि लांब होते. इतके की त्या केसांनी मुलाचे डोळे झाकले गेले होते. या मुलाला डोळेच नाहीत की काय अशी शंका आली. तेव्हा केस बाजूला सारून पहाताच मुलाचे अत्यंत तेजस्वी डोळे दिसून आले.

मुलाचा जन्म होण्यापूर्वी निंबरगीकरमहाराजांचा निरोप आला होता :- ''पहिले दहा दिवस या मुलाला आईजवळ फारसे नेऊ नका.'' दहा दिवस मुलाला सांभाळण्यास अन्य कोणी स्त्री नव्हती. म्हणून त्या मुलाचा दहा दिवस सांभाळ करण्यास निंबरगीकरमहाराजांनी लक्ष्मीबाई अक्कांना चिमडास पाठविले होते. अक्कांनी दहा दिवस मूल सांभाळले. मग त्याला माईसाहेबांच्या स्वाधीन करून लक्ष्मीबाई अक्का निंबरगीस परत गेल्या. या दहा दिवसात ते मूल चांगले टुकटुकीत होते आणि बसविले असता ते नीट बसत असे.

या नूतन अर्भकाच्या बारश्याचे दिवशी त्याला रघुनाथप्रिय साधुमहाराजांचे 'रघुनाथ' हे नाव ठेवण्यात आले. पण हे मूल रडवे होते. पुढे एकदा चिमडमहाराज आणि माईसाहेब मुलाला घेऊन निंबरगीस गेले असता, ''मूल रडते. काय करावे?'' असे माईसाहेबांनी निंबरगीकरमहाराजांना विचारले. तेव्हा निंबरगीकरमहाराजांनी पृच्छा केली, ''या मुलाचे नाव काय ठेवले आहे?'' ''रघुनाथ,'' असे माईसाहेब म्हणाल्या. तेव्हा निंबरगीकरमहाराज म्हणाले, ''तुम्ही लोक आता या मुलाला ''दाजीबा'' या नावाने हाक मारा म्हणजे त्याचे रडे थांबेल.'' त्याप्रमाणे सर्वांनी मुलाला दाजीबा या नावाने हाक मारण्यास सुरुवात केली. तसे करताच मुलाचे रडे थांबले. पुढे निंबरगीकरमहाराजांनी मुलाला आपले मांडीवर ठेवण्यास सांगितले. त्यांनी त्याच्या



मस्तकावरून आपला अमृतहस्त फिरविला. तेव्हा निंबरगीकरमहाराजांकडे पाहून मूल हसू लागले.

**स्मशानात गंगा भागीरथी आली**

चिमडच्या स्मशानात राहू लागल्यावर, आपल्या पर्णकुटीजवळच साधुमहाराजांचे समाधिमंदिर बांधून घेण्याचे चिमडमहाराजांनी ठरविले. त्यानुसार मंदिरासाठी पाया खोदण्यास प्रारंभ झाला. खोदकाम चालू असता, सुमारे ५/६ हात खोलीवर, वैशाख वद्य ३०, शके १८०२ (इ.स.१८८०) या दिवशी पांढऱ्या शुभ्र स्वच्छ पाण्याचा उमाळा उसळून वर आला. हे कळताच चिमडमहाराज उद्गारले, ''निंबरगीकरमहाराजांच्या इच्छेने येथे साक्षात् गंगा भागीरथी साधुमहाराजांच्या दर्शनास आली आहे.'' नंतर ते असेही म्हणाले, ''या पाण्याला विटाळ न झाल्यास या गंगेच्या उदकाने रोगराई दूर होईल.'' त्यांच्या वचनाप्रमाणे या गंगेच्या पाण्याने रोग दूर होण्याचे अनुभव पुढे अनेक माणसांना आले.

**तापनाशी तीर्थ**

स्मशानात गंगा प्रगट झाल्याची हकीकत चिमडमहाराजांनी निंबरगीकरमहाराजांना कळविली. मग त्यांच्या आज्ञेनुसार या पाण्याभोवती एक सुंदर विहीर बांधवून घेण्यात आली आणि तिला ''तापनाशी'' असे नाव देण्यात आले. या तापनाशी तीर्थातील पाण्याने रोगांचा परिहार होतो ही वार्ता आजूबाजूस पसरली. तेव्हा अनेक रोगग्रस्त माणसे तेथे येऊन, स्नान करून, रोगमुक्त होऊन जाऊ लागली. या तापनाशी तीर्थाचे उदक निंबरगीकरमहाराजांनाही आपल्या निर्वाणापूर्वी हवे होते, ही गोष्ट येथे नमूद करावयास हवी.

या तापनाशी तीर्थाचे महत्त्व वर्णन करणारे एक पद चिमडमहाराजांना स्फुरले ते असेः-

ऐका भाविकजन हो साधूच्या दर्शना आली गंगा ।
या तापनाशी तीर्थी साधूच्या दर्शना आली गंगा ।।१।।
तापा हीच निवारी म्हणवुनी हिज तापनाशी हे नाम ।
सलिली हिच्या नहाता अघ नासुनी सफल करीतसे काम ।।२।।

रोगादि व्यथा जाऊनि दिव्य करी देहमार्जने एका ।
स्नाता कोटिगुणे फळ देऊन मोक्षासी नेई जनलोका ।।३।।
ऐशी माता गंगा आली जनलोक उद्धारायाला ।
भ्याला काय अघाला न्हाला तो मुक्त होऊनी गेला ।।४।।
सद्गुरुप्रसाद वरदे चिमडपुरी गुप्त वास हा केला ।
रघुनाथप्रिय माझा कैवारी उभाचि *दास* हाकेला ।।५।।

**समाधिमंदिराची उभारणी आणि देवस्थापना**

तापनाशी विहीर बांधून झाल्यावर, तिच्या मध्यभागी पाण्यामध्येच चिमडमहाराजांनी एक चौकोनी आकाराचे मंदिर बांधवून घेतले. या मंदिरात आता देव म्हणून साधुमहाराजांच्या पादुकांची स्थापना व्हावयाची होती. या पादुकांबरोबर साधुमहाराजांच्या निंबरगीकरमहाराज या गुरूंचे एकादे स्मृतिचिन्ह तेथे असावे, अशी चिमडमहाराजांना तीव्र इच्छा झाली. ती त्यांनी निंबरगीकरमहाराजांना कळविली. तेव्हा ''आम्ही जिवंत असतानाच तुम्ही आमची स्थापना करणार म्हणता! ठीक आहे. होऊ दे तुमच्या इच्छेप्रमाणे! पण एक करा. आमच्या बरोबर आमच्या काडसिद्ध गुरूंनाही बरोबर घ्या,'' असे निंबरगीकरमहाराजांनी कळविले.

निंबरगीकरमहाराजांच्या या अनुज्ञेनंतर, साधुमहाराजांच्या पादुका, निंबरगीकरमहाराजांच्या नावाची एक पिंडी आणि काडसिद्धांच्या नावाचा एक बाण अशा तीन प्रतीकांची स्थापना मंदिरात, मार्गशीर्ष वद्य ७, शके १८०३ (इ.स.१८८१) या शुभ दिवशी चिमडमहाराजांच्या पवित्र हस्तांनी झाली. काडसिद्धांच्या नावे स्थापित झालेल्या बाणाचा पूर्वइतिहासही येथे सांगण्यासारखा आहे. शके १८०२ (इ.स.१८८०) मध्ये कपिला षष्ठीच्या योगावर चिमडमहाराज भिलवडी गावाजवळील कृष्णा नदीत स्नान करीत होते. त्यावेळी पाण्यात बुडी मारल्यावर त्यांच्या हाताला एक बाण लागला. चिमडमहाराज शिवाचे उपासक असल्याने त्यांनी तो बाण आपल्या पूजेत ठेवला होता. तोच बाण आता काडसिद्धांचा बाण या स्वरूपामध्ये या मंदिरात स्थापन झाला. अशाप्रकारे चिमड गावाजवळील एका ओसाड पडलेल्या स्मशानस्थानी एक पवित्र त्रैमूर्तींचे मंदिर उभे राहिले.



या साधुमहाराजांच्या मंदिराबद्दल निंबरगीकरमहाराजांनी जे उद्गार काढले होते, ते लक्षणीय आहेत :- शके १८०६ (इ.स.१८८४) मध्ये महालिंगपूर इत्यादि गावातील भक्तांसह चिमडमहाराज निंबरगीकरमहाराजांच्या दर्शनास गेले होते. त्यावेळी निंबरगीकरमहाराज म्हणाले होते :- ''रामभाऊ, आता चिमडास साधुमहाराजांना देव म्हणून बसविले आहे. चिमड येथील साधुमहाराजांचे हे देवस्थान आता महाक्षेत्र झाले आहे. तेथे गंगा भागीरथीचा वास आहेच. आणि तेथे साधुमहाराजांचे दर्शनास दररोज गोरखनाथ,मत्स्येंद्रनाथ, दत्तात्रेय इत्यादि महासिद्ध येत असतात.''

या साधुमहाराजांच्या मंदिरासाठी तसेच चिमडमहाराजांच्या योगक्षेमासाठी चिमडच्या भक्तांनी चिमड, महालिंगपूर, रबकवी,जमखंडी इत्यादि जवळपासच्या गावातील भक्तमंडळींकडून द्रव्य जमवले होते. या भक्तांनी स्वेच्छेने आणि संतोषाने अर्थसहाय्य केले होते. पुढे चिमडमहाराजांचे एक श्रेष्ठ शिष्य शिवरामबुवा नावाचे होते; त्यांचे श्रीमंत शिष्य होते. ते भिक्षा मागत. त्यांना भिक्षेत जे जे मिळे ते ते त्यांनी या देवस्थानाला व मठाला अर्पण केले. अशाप्रकारे साधुमहाराजांचे मंदिर आणि चिमडमहाराज यांची व्यवस्था झाली.

**दैनिक कार्यक्रम**

साधुमहाराजांच्या मंदिराची स्थापना झाल्यावर, आपल्या आणि आपल्या भक्तांच्या साधनाला जोड म्हणून बाह्यदृष्ट्या काही नित्य नेम असावा, या दृष्टिकोनातून चिमडमहाराजांनी आपल्या मठातील कार्यक्रमांची विशिष्ट आखणी केली ती अशी :- पहाटे काकडआरती, सकाळी त्रैमूर्तींची पूजा, तिसरे प्रहरी पोथी/पुराण यांचे वाचन आणि प्रवचन, संध्याकाळी धूपारती आणि रात्री पंचपदी, असा दैनंदिन कार्यक्रम चिमडमहाराजांनी सुरू केला. या सर्व कार्यक्रमासाठी लागणारी सर्व पूर्वसिद्धता आणि उत्तरसिद्धता माईसाहेब मोठ्या हौसेने करीत.

चिमड संप्रदाय हा गुरुसंप्रदाय आहे. या संप्रदायात गुरु अतोनात महत्त्वाचा आहे. गुरूचे हे महत्त्व दाखविण्यासाठी चिमडमहाराजांनी काही पदे रचली व त्यांना पंचपदी असे नाव दिले. ही पंचपदी रोज रात्री सामुदायिकपणे पठण करण्याची पद्धत होती.

वरील दैनंदिन कार्यक्रमांच्या जोडीने आणखी काही कार्यक्रम चिमडमहाराजांनी निश्चित केले ते असेः- चैत्र शुद्ध प्रतिपदेपासून चैत्र शुद्ध तृतीया या तीन दिवसांत

साधुमहाराजांच्या आराधनेचा महत्त्वाचा कार्यक्रम असे. तसेच गुरुद्वादशी (आश्विन वद्य १२) ते पांडवपंचमी (कार्तिक शुद्ध ५) या कालावधीत साधुमहाराजांच्या रथोत्सवाचा कार्यक्रम केला जाई. या रथोत्सवाचा मुख्य कार्यक्रम पांडवपंचमी या दिवशी असे.

## अनुगृहीतांचा विस्तार आणि मठातील राबता

यथाकाल साधुमहाराजांच्या देवस्थानाची कीर्ति वाढत गेली. अनेकांनी चिमडला येऊन चिमडमहाराजांचा अनुग्रह घेतला. त्यांचे अनुगृहीत चिमड, महालिंगपूर, रबकवी, जमखंडी, मुधोळ, विजापूर, बेळगाव, धारवाड, नाशिक, बेंगळूर, मैसूर, तंजावर, सांगली, कोल्हापूर, वसगडे, तासगाव, सातारा, पुणे, मुंबई, काशी इत्यादि ठिकाणी पसरले होते. या अनुगृहीतांमध्ये ब्रह्मचारी, वेदशास्त्रज्ञ, पुराणिक, विश्वविद्यालयातील उच्च पदवीधारक, इंजिनिअर, डॉक्टर, वकिल वगैरे लोक, सरकारी सेवक, व्यापारी, स्मार्त आणि भागवत लोक, मध्वसंप्रदायी, बौद्धधर्मी व जैनधर्मी लोक, लिंगायत, पांचाळ तसेच नाना मतांचे लोक आहेत. खेरीज गिरी, पुरी, बाल, भारती इत्यादि दशनामी गोसावीही आहेत. हे लोक वर्षातून केव्हाही दर्शनास येत. त्यांना भोजनासाठी मुक्तद्वार असे.

असा भक्तांचा राबता वाढला. साहजिकच माईसाहेबांचे काम वाढत गेले. म्हणून उपन्यासात म्हटल्याप्रमाणे त्यांनी पतीला सांगितले. पतीचे उत्तर लक्षात ठेवून माईसाहेब आपले कर्तव्य चोख बजावू लागल्या. घरातील सर्व काही पहाण्यास त्यांनी कंबर कसली. येणाऱ्या जाणाऱ्या भक्तसमूहाचे त्या हसतमुखाने स्वागत करीत. त्यांच्या जेवणाखाणाकडे आपुलकीने लक्ष पुरवीत. त्यांची वागणूक इतकी चांगली असे की येणाऱ्या भक्तांना माईसाहेब या आपल्या आईच आहेत असे वाटे. अशाप्रकारे सर्व घरगुती काम झाल्यावर माईसाहेब फावल्या वेळेत साधन मग्न होऊन जात.

## निंबरगीकरमहाराजांचा चिमडमहाराजांना आशीर्वाद

चिमडला आल्यावरही चिमडमहाराजांची पौष महिन्याची निंबरगीची वारी चालूच होती. इ.स. १८८४ च्या पौष महिन्यात चिमडमहाराज निंबरगीला गेले होते. त्यावेळी निंबरगीकरमहाराज आपल्या निर्याणापूर्वीची निरवानिरव करीत होते. त्यांनी लक्ष्मीबाई अक्कांना आज्ञा दिली :– ''अक्का, रामभाऊ जेथे उतरले आहेत तेथे जा आणि माझ्या वतीने सर्व परमार्थ त्यांच्याकडे सोपव. तसेच 'परमार्थाने तुमचा लखलाभ होवो' असा माझा आशीर्वाद त्यांना सांग.'' निंबरगीकरमहाराजांची आज्ञा शिरसावंद्य मानून लक्ष्मीबाई अक्कांनी तसे केले. त्यानंतर लक्ष्मीबाई अक्का निंबरगीकरमहाराजांना असे म्हणाल्या, ''महाराज, आता तुम्ही सर्व परमार्थ रामभाऊंकडे सोपविला आहेच. आता आणखी असे करा – रामभाऊंना आशीर्वाद द्या की त्यांची मुले, नातवंडे या सर्वांना परमार्थाचा लखलाभ होवो.'' अक्कांची ही सूचना निंबरगीकरमहाराजांना आवडली. त्याप्रमाणे त्यांनी रामभाऊंना – चिमडमहाराजांना – आशीर्वाद दिला आणि त्यांना प्रसादाचा म्हणून एक नारळ दिला.



## माईसाहेबांना कन्या व पुत्र यांची प्राप्ति

आपल्या पतीबरोबर माईसाहेब चिमडला इ.स.१८८० मध्ये आल्या. आल्यावर त्यांना झालेल्या पुत्राचे नाव दाजीबा असे ठेवण्यात आले. इ.स. १८८५ साली माईसाहेबांना नारायण नावाचा पुत्र झाला. इ.स. १८८० ते १८८५ या काळात केव्हातरी माईसाहेबांना बहिणा नावाची कन्या झाली असे दिसते. तिच्या जन्माची स्वतंत्र नोंद कुठे सापडत नाही. फक्त तिच्या विवाहाच्या संदर्भातले चिमडमहाराजांचे पुढील वचन उपलब्ध आहे – 'बहिणाबाईला तात्यासाहेब वसगडेकर यांच्या घरी विवाह करून द्यावे.' यावरून बहिणाचा जन्म हा इ.स. १८८० ते १८८५ या दरम्यानच्या काळात केव्हातरी झाला असावा असे अनुमान येथे केले आहे.

यानंतर चैत्र वद्य १४, शके १८०७ (इ.स. १८८५) या शुभ दिवशी माईसाहेबांनी एका पुत्राला जन्म दिला. बारश्याचे वेळी या मुलाचे नाव 'नारायण' असे ठेवण्यात आले. या मुलाला नारायण हे नाव ठेवण्यास एक विशिष्ट कारण घडले होते ते असे :– हा मुलगा माईसाहेबांच्या गर्भात स्थित असताना माईसाहेबांना निंबरगीकरमहाराजांचे दर्शन झाले होते. या दर्शनाचे वैशिष्ट्य असे होते :– चैत्र शुद्ध द्वादशी इ.स. १८८५ या दिवशी निंबरगीकरमहाराजांनी महानिर्याण केले होते. त्यानंतर कृपावंत होऊन त्यांनी माईसाहेबांना दर्शन दिले होते. निंबरगीकरमहाराजांचे नाव नारायण होते. म्हणून या नूतन मुलाचे नाव नारायण असे ठेवण्यात आले.

## लक्ष्मीबाई अक्कांचे चिमडास आगमन

माईसाहेब आणि चिमडमहाराज या दांपत्याचे दिवस समाधानात जात असताना इ.स.१८८५ हे साल उजाडले. या वर्षी निंबरगीकरमहाराजांना ९५ वे वर्ष लागले होते. आणि या वर्षी त्यांनी निर्याण करण्याचे ठरविले होते. देह ठेवण्यास आपण चिमडला

जावे असे त्यांच्या मनात होते. परंतु काही कारणांनी तसे होऊ शकले नाही. आणि चैत्र शुद्ध द्वादशी, इ.स. १८८५ रोजी शिवस्मरण करीत ते शिवस्वरूप झाले. त्यांनी मुलीप्रमाणे सांभाळलेल्या लक्ष्मीबाई अक्कांना परमावधीचे दुःख झाले. निंबरगीकरमहाराजांच्या निर्याणाची वार्ता चिमडमहाराजांना कळताच, ते निंबरगीकरमहाराजांच्या घरचे मंडळींचे सांत्वन करण्यास निंबरगीस गेले. त्यानंतर ते तडक लक्ष्मीबाई अक्कांच्या घरी गेले. त्यांनी यथाशक्ति लक्ष्मीबाई अक्कांचे सांत्वन केले. मग त्यांनी त्यांच्यापुढे आपली योजना मांडली. ते म्हणाले, ''अक्का, आता तुमचे वाली असणारे निंबरगीकरमहाराज विद्यमान नाहीत. त्यांनी मला सांगून ठेवले होते की, 'रामभाऊ, माझ्या निर्याणानंतर तुम्ही आमच्या अक्कांचा सांभाळ करावा.' आणखी असे :- 'माझ्या निर्याणानंतर तुम्हाला चिमडला रहावे लागेल,' असे निंबरगीकरमहाराजांनी तुम्हालाही सांगून ठेवले होते. तेव्हा तुम्ही आता मजबरोबर चिमडास यावे.'' चिमडला कायम रहावयास जावे की नाही असा विचार लक्ष्मीबाई अक्कांना पडला. शेवटी निंबरगीकरमहाराजांचे वचन लक्षात घेऊन त्यांनी चिमडला जाण्याचे ठरविले. त्याप्रमाणे लक्ष्मीबाई अक्का चिमडमहाराजांचे बरोबर चिमडला रहाण्यास आल्या आणि आपले निर्याण होईपर्यंत त्या चिमडासच राहिल्या.

निंबरगीस जाण्यापूर्वी, ''मी लक्ष्मीबाई अक्कांना बहुतेक चिमडास आणीन '' असे त्यांनी माईसाहेबांना सांगितले होते. आता प्रत्यक्ष त्या चिमडास आल्या. तेव्हा लक्ष्मीबाई अक्का व माईसाहेब यांच्यात संघर्ष निर्माण होऊ नये, या इच्छेने चिमडमहाराजांनी माईसाहेबांना म्हटले, ''माई, लक्ष्मीबाई अक्का आता आपल्याकडे रहावयास आल्या आहेत. त्या तुमच्यापेक्षा वयाने वडिल आहेत. परमार्थातही त्यांचा मोठा अधिकार आहे. आणि आता त्यांना निंबरगीकरमहाराजांचाही आधार नाही. हे सर्व लक्षात घेऊन तुम्हा दोघीमध्ये बखेडा होणार नाही, याची जास्त काळजी तुम्हालाच घ्यावी लागणार आहे आणि तशी तुम्ही घ्याल अशी माझी खात्री आहे.'' लक्ष्मीबाई अक्का या प्रेमळ स्वभावाच्या होत्या. त्यांना माईसाहेबांबद्दल ममता होती. तर माईसाहेब याही मायाळु होत्या. वडिल माणसांबद्दल त्यांच्या मनात आदर असे. खेरीज परक्या असणाऱ्या भक्तमंडळींशी आपुलकीने वागण्याची सवय त्यांना होती. त्या बहुधा दुसऱ्याचे मन मोडीत नसत. साधुमहाराजांनी केलेला उपदेशही त्यांच्या स्मरणात होता. तेव्हा लक्ष्मीबाई अक्कांशी जमवून घेण्याचे त्यांनी ठरविले. त्याप्रमाणे लक्ष्मीबाई



अक्कांचे निर्याण होईपर्यंत त्या दोघींमध्ये सलोखा राहिला आणि कोणताही संघर्ष / बखेडा झाला नाही.

## मुधोळचे शिष्य

सत्पुरुष म्हणून चिमडमहाराजांची कीर्ति पसरत होती. अशा स्थितीत इ.स. १८८६-१८८८ या काळात मुधोळ गावची काही मंडळी चिमडमहाराजांचे शिष्य बनली. हे असे घडले :- बाबासाहेब मुजुमदार या नावाचे एक सद्‌गृहस्थ मुधोळ गावात न्यायाधीश होते. ते मूळ सांगली गावचे रहाणारे. त्यामुळे कारणपरत्वे ते घोड्यावर बसून सांगलीस येजा करीत. वाटेत ते चिमडमठात विश्रांतीसाठी थांबत असत. चिमडमहाराजांचा पारमार्थिक अधिकार त्यांना माहीत नव्हता. त्यामुळे ते चिमडमहाराजांशी बरोबरीच्या नात्याने वागत. चिमडमहाराज तर ते न्यायाधीश म्हणून त्यांना मान देत. हे चिमडमहाराजांच्या शिष्यांना आवडत नसे. त्यांनी आग्रह केला केला की बाबासाहेब तुमचा मान राखतील असे काहीतरी तुम्ही करा. जेव्हा भक्तांचा फार आग्रह पडला तेव्हा चिमडमहाराजांनी असे काहीतरी केले की बाबासाहेब स्वतःचा मोठेपणा बाजूला सारून चिमडमहाराजांना शरण गेले. त्यांनी चिमडमहाराजांना अनुग्रह देण्याची विनंति केली. त्यानुसार चिमडमहाराजांनी बाबासाहेबांना इ.स. १८८६ मध्ये अनुग्रह दिला.

बाबासाहेबांचे वेळीच वामनराव कोटणीस, त्यांचे पुतणे ह.पां.कोटणीस, गोपाळराव दीक्षित इत्यादि काही लोक मुधोळासच नोकरी करीत होते. बाबासाहेबांच्या संबंधामुळेच या इतर लोकांनाही चिमडमहाराजांचा अनुग्रह मिळाला. या लोकांना चिमडमहाराजांचे इतके आकर्षण निर्माण झाले की यांतील बरेच भक्त शनिवार-रविवार चिमडमहाराजांच्या दर्शनास येऊन मठातच मुक्काम करीत.

इ.स.१८८८ च्या पूर्वार्धात बाबासाहेब मुजुमदार, गोपाळराव दीक्षित, अप्पाराव भावे, अण्णा मास्तर, गो.दा. दीक्षित, विनायक साठे इत्यादि काही लोकांवर मुधोळ संस्थानच्या अधिपतींची इतराजी झाली आणि त्यांनी त्यांना नोकरीवरून काढून टाकले. तेव्हा हे लोक चार पाच महिने चिमडमहाराजांचे जवळ मठातच राहिले. पुढे इ.स. १८८९ साली ह.पां.कोटणीस (महाराज) यांनी मुधोळची नोकरी सोडण्याच्या इराद्याने बिनपगारी रजा काढली. तेही काही काळ चिमडमठात येऊन राहिले होते. या सर्वांचे आगतस्वागत माईसाहेब यथोचितपणे करीत असत.

## देवकाचा विवाह

चिमडमहाराजांच्या छत्राखाली माईसाहेबांचा प्रपंच आणि परमार्थ व्यवस्थित चालू होता. कालक्रमाने माईसाहेबांची देवका नावाची कन्या ही विवाहयोग्य झाली होती. तिच्या लग्नाचा विचार माईसाहेबांच्या मनात आला आणि त्यांनी तिच्यासाठी योग्य वर शोधण्याचा लकडा आपले पतीचे मागे लावला. चिमडमहाराज मठाचे काम सोडून कुठे जाणार? तेव्हा आपल्याकडे येणाऱ्या भक्तांच्या नात्यात योग्य वर आहे का याचा शोध चिमडमहाराज घेऊ लागले. वामनराव कोटणीस नावाचे चिमडमहाराजांचे एक शिष्य होते. त्यांना गोपाळ या नावाचा एक सद्गुणी आणि सदाचारी मुलगा होता. त्याला मुधोळ संस्थानात नोकरीही होती. त्यालाही परमार्थाची आवड होती. हा मुलगा देवकाला योग्य वर ठरेल असे चिमडमहाराजांना वाटले. त्यांनी गोपाळविषयी माईसाहेबांना सांगितले. माईसाहेबांनाही गोपाळ हा वर देवकासाठी योग्य वाटला. मग माईसाहेबांच्या संमतीने चिमडमहाराजांनी वामनरावांशी बोलणी केली. वामनराव कोटणीसांनाही ही सोयरीक पसंत पडली. मग दोन्ही बाजूंच्या संमतीने देवका आणि गोपाळ यांचा विवाह इ.स. १८८८ मध्ये चिमडमठात थाटामाटाने साजरा झाला.

## देवकाच्या विवाहसमयीचे काही प्रसंग

देवकाचा प्रत्यक्ष विवाह होण्यापूर्वी दोनतीन महत्त्वाचे प्रसंग घडले. त्यातून चिमडमहाराजांचा अधिकार दिसून आला. हे प्रसंग असे :- चिमडमहाराज कधी कधी घोडे वापरीत. हे घोडे मठात बांधलेले असे. देवकाच्या लग्नापूर्वी या घोड्याला चांदणी लागली. त्याचे तोंडातून लाळ गळू लागली व ते निश्चेष्ट झाले. लग्नात अपशकुन नको म्हणून त्या घोड्याला मठाचे बाहेर नेऊन बांधून ठेवण्यात आले. त्याला पाहून कुणब्याचे एक पोर जवळ होते. ते म्हणाले, ''हे घोडे आता मरेल!'' त्याचवेळी चिमडमहाराज तिकडून जात होते. त्या पोराचे ते शब्द ऐकल्यावर चिमडमहाराज बोलले, ''कसे काय हे घोडे मरते ते पाहू!'' असे बोलून त्यांनी घोड्याच्या अंगावरून आपला अमृतहस्त फिरविला. तोच ते घोडे चट्दिशी उभे राहिले आणि पुढे केलेली चंदी खाऊ लागले.

देवकाच्या लग्नाप्रीत्यर्थ एक तंबू उभारण्यात आला होता. त्यावेळी तंबूच्या तणाव्याची एक दोरी जवळच असणाऱ्या औदुंबर वृक्षास गडीमाणसांनी बांधलेली होती. तोच तंबूचे आत खडे येऊन पडू लागले. खडे कोठून येत आहेत हे कळतच



नव्हते. ही हकिकत कळताच चिमडमहाराज तेथे आले. औदुंबर वृक्षात दत्तात्रेयाचा वास असतो हे त्यांच्या लक्षात आले. औदुंबराला बांधलेली दोरी तत्काळ सोडून टाकण्यास त्यांनी सांगितले. दोरी सुटताच तंबूत खडे पडणे बंद झाले.

देवकासाठी नेमस्त केलेला गोपाळ हा वर सांगलीच्या ह.पां.ऊर्फ तात्यासाहेब कोटणीसमहाराज यांचा चुलत भाऊ होता. साहजिकच त्याच्या विवाहासाठी कोटणीसमहाराज चिमडला आले होते. त्यांच्याबरोबर त्यांचे कुटुंब होते. त्यांना कल्लव्वा नावाची चार पाच महिन्यांची लहान कन्या होती. तिची प्रकृति अचानक बिघडली आणि ती अत्यवस्थ झाली. तेव्हा कोटणीसमहाराजांच्या मातोश्रींनी ती गोष्ट चिमडमहाराजांच्या कानी घातली. क्षणमात्र विचार करून चिमडमहाराज हसून बोलले, ''अहो, ही पोर आता मरणार नाही. अहो, ही तर पुढे आमची सून होणार आहे.'' चिमडमहाराजांच्या या वचनाप्रमाणे कल्लव्वा त्या दुखण्यातून बरी झाली आणि पुढे ती दाजीसाहेबांची पत्नी होऊन चिमडमहाराजांची सून झाली, हे येथे नमूद करावयास हवे. वरील प्रसंगाचा योग्य तो निकाल लागल्यावर पुढे देवकाचा विवाह निर्विघ्नपणे पार पडला.

## उद्धवरावजींचा जन्म

देवका अक्कांचा विवाहसोहळा यथासांग पार पडला. त्यानंतर इ.स.१८८९ चे सुमारास माईसाहेबांनी एका मुलास जन्म दिला. या मुलाच्या जन्मसालाची नोंद नाही. तथापि इ.स. १८९१ साली जेव्हा चिमडमहाराज निजधामास गेले, तेव्हा हा उद्धव नावाचा मुलगा दीड वर्षाचा होता अशी नोंद आहे. म्हणून हा उद्धव मुलगा इ.स.१८८९चे सुमारास जन्मला असे म्हटले आहे.

जन्मतःच या मुलाच्या कानाच्या पाळ्यांना भोके होती. ती पाहिल्यावर लक्ष्मीबाई अक्का म्हणाल्या, ''हा मुलगा म्हणजे एक कानफाट्या योगी चिमडमहाराजांचा पुत्र म्हणून अवतरला आहे.'' तर 'हे उद्धवराव म्हणजे गोरक्षनाथाचा अवतार' असे दासराममहाराज केळकर यांनी लिहून ठेवले आहे. हा मुलगा लहानपणी रडवा होता. तेव्हा 'या मुलाचे नाव उद्धव असे ठेवा' असे चिमडमहाराजांनी माईसाहेबांना सांगितले. तसे करताच मुलाचे रडे थांबले.

## माईसाहेबांना काशी विश्वेश्वराचे दर्शन

पति, पुत्र आणि भक्त यांचेकडे लक्ष देत माईसाहेबांचे दिवस जात होते. अशातच

एकदा चिमडच्या काही स्त्रिया काशीयात्रेला निघाल्या. माईसाहेबांकडे येऊन त्या स्त्रिया म्हणाल्या, ''माईसाहेब, आपण आमचेबरोबर काशीयात्रेस यावे अशी आमची इच्छा आहे.'' त्या स्त्रियांची ती इच्छा माईसाहेबांनी आपल्या पतीच्या कानावर घातली आणि विचारले, ''अहो, मी या बायकांच्या बरोबर काशीला जाऊ काय?'' प्रश्न ऐकताच चिमडमहाराज उत्तरले,''अहो माई, तुम्ही काशीयात्रेला कशासाठी जाणार? काशी विश्वेश्वराचे दर्शन घेण्यासच ना?'' माईसाहेब ''होय'' म्हणाल्या. तेव्हा चिमडमहाराज म्हणाले, ''अहो, काशी विश्वेश्वराच्या दर्शनासाठी काशीस जाण्याची काय जरुरी आहे? मी तुम्हाला येथेच काशी विश्वेश्वराचे दर्शन घडवितो. मग तर तुमचे समाधान होईल ना?'' माईसाहेबांनी होकारार्थी उत्तर दिले. लगेच चिमडमहाराजांनी माईसाहेबांच्या मस्तकावर आपला हात ठेवला तोच माईसाहेबांना काशी विश्वेश्वराचे साक्षात् दर्शन झाले. माईसाहेबांना आनंद झाला. अशाप्रकारे प्रत्यक्ष काशी येथे न जाता, पतीच्या कृपाप्रसादाने माईसाहेबांना काशी विश्वेश्वराचे दर्शन झाले.

### आळंदीची यात्रा

प्रपंचातच परमार्थाचा आनंद भोगीत माईसाहेबांचे जीवन चालले होते. यथाक्रम काळाच्या ओघात इ.स.१८९० हे वर्ष आले. या वर्षी लक्ष्मीबाई अक्कांना अशी इच्छा झाली की आपण परळी, आळंदी आणि देहू येथे जाऊन समर्थ रामदासांचे स्थान, ज्ञानेश्वरमहाराजांची समाधि आणि तुकाराममहाराजांचे स्थळ यांचे दर्शन घेऊन यावे. त्यांच्या इच्छेला मान देऊन ही यात्रा करण्याचे चिमडमहाराजांनी निश्चित केले आणि इ.स.१८९० च्या आषाढ महिन्यात माईसाहेबांना बरोबर घेऊन ते यात्रेला निघाले.

प्रथम चिमडमहाराज सातारा येथे गेले. तेथे ते त्यांचे पुतणे बळवंतराव यांचे घरी उतरले होते. हे बळवंतराव म्हणजे चिमडमहाराजांचे थोरले बंधु चुलत्याला दत्तक गेले होते, त्यांचे चिरंजीव होत. सातारा येथून सर्वजण परळी येथील रामदासस्वामींच्या स्थानी गेले. त्यानंतर ही सर्व मंडळी आळंदी येथे गेली. तेथे ज्ञानेश्वरमहाराजांच्या समाधीचे दर्शन घेताना असे घडले :- ज्ञानेश्वरमहाराजांच्या समाधीतून 'देवाचिये द्वारी उभा क्षणभरी । तेणे मुक्ती चारी ओळंगल्या' हा ज्ञानेश्वरमहाराजांच्या हरिपाठाच्या पहिल्या अभंगाचा पहिला चरण चिमडमहाराजांना ऐकू आला. त्यांचे बरोबर असणाऱ्या लक्ष्मीबाई अक्का आणि माईसाहेब यांनाही तो चरण ऐकू आला.

त्यानंतर पुष्पमंडपात पुष्पांचे सिंहासनावर बसलेल्या आणि कंठात रुद्राक्षमाळा धारण करणाऱ्या ज्ञानेश्वरमहाराजांचे दर्शन चिमडमहाराजांना झाले. या समयी चिमडमहाराजांना उद्देशून ज्ञानेश्वरमहाराज म्हणाले, ''रामभाऊ, चला चला, लौकर आटपा. तुमची निजधामास येण्याची वेळ झाली आहे.'' येथे पुढील गोष्ट लक्षात ठेवावी :- ज्ञानेश्वरमहाराजांचा अवतार एकनाथमहाराज होते. आणि निंबरगीकरमहाराजांनी म्हटल्याप्रमाणे एकनाथमहाराजांचा अवतार चिमडमहाराज होते. म्हणून ज्ञानेश्वरमहाराजांनी निजधामास येण्याचा आदेश चिमडमहाराजांना दिला. ''आपल्या सूचनेप्रमाणे मी लौकरच निजधामी येतो,'' असे चिमडमहाराजांनी ज्ञानेश्वरमहाराजांना कथन केले. हे सर्व संभाषण चिमडमहाराजांनी लक्ष्मीबाई अक्का व माईसाहेब यांना सांगितले. तेव्हा निर्याणास जाण्यापूर्वी निरवानिरव करावयास वेळ हवा, असा विचार करून चिमडमहाराजांनी देहूस जाण्याचा बेत रद्द केला आणि ते आळंदीतूनच चिमडला परत आले.



### चिमडमहाराजांची निरवानिरव

ज्ञानेश्वरमहाराजांना कबूल केल्याप्रमाणे लौकरच म्हणजे इ.स.१८९१ मध्ये निजधामास जाण्याचे चिमडमहाराजांनी निश्चित केले आणि तसे लक्ष्मीबाई अक्का व माईसाहेब यांना सांगितले व त्यांच्या संमतीने आवराआवर करण्यास प्रारंभ केला.

कोटणीसमहाराजांची कन्या कल्लव्वा ही आपली सून होणार असे भविष्य चिमडमहाराजांनी मागे केले होते. त्याला अनुसरून कोटणीसमहाराजांच्या संमतीने आपला ज्येष्ठ दाजीबा पुत्राचा विवाह कल्लव्वा हिच्याशी माईसाहेबांच्या संमतीने ठरविला. आणि हा विवाह समारंभ शनिवार वैशाख शुद्ध ८, इ.स.१८९१ या दिवशी उत्साहाने पार पडला.

दाजीबांचा विवाह होण्यापूर्वी आपल्या सहा वर्षांच्या नारायण नावाच्या पुत्राचा उपनयन संस्कार चिमडमहाराजांनी वैशाख शुद्ध पंचमी, इ.स.१८९१ या दिवशी उरकून घेतला.

इ.स. १८९१ सालचा साधुमहाराजांचा रथोत्सव हा चिमडमहाराजांच्या कारकीर्दीतील अंतिम उत्सव होता. तो मोठ्या थाटामाटाने त्यांनी साजरा केला. त्यानंतर आता आपण लौकरच महाप्रयाण करणार असे चिमडमहाराजांनी लक्ष्मीबाई अक्का आणि माईसाहेब यांना सांगितले. दोघींनाही दुःख झाले. विशेषेकरून माईसाहेबांची तगमग झाली. पण दैवाने ठरलेल्या गोष्टींना इलाज नसतो, हे जाणून त्यांनी तो प्रसंग सहन करण्याची मानसिक तयारी केली.

आपल्या महानिर्याणाची तिथि निश्चित करून चिमडमहाराज एकदा माईसाहेबांना म्हणाले, ''अहो, आम्ही आता देह ठेवणार आहोत. आपली मुले अद्यापि लहान आहेत. तेव्हा दाजीबा वयात येईपर्यंत, आपल्या लक्ष्मीबाई अक्कांकडे मठाची देखभाल मी सोपवणार आहे. कारण त्या वयाने ज्येष्ठ आहेत आणि परमार्थातील अधिकारी आहेत. ज्येष्ठ व्यक्ती या नात्याने प्रपंचाकडेही लक्ष राहील. मला वाटते, ही व्यवस्था तुम्हास मान्य होईल.'' माईसाहेबांनी उत्तर दिले, ''अहो, आपले वचन हे मी नेहमीच प्रमाण मानले आहे. तुम्ही सर्व विचार केला आहे. तेव्हा तुम्ही ठरविलेल्या व्यवस्थेत काही गैर मला दिसत नाही. तुमची इच्छा मला मान्य आहे.'' माईसाहेबांचे हे उत्तर ऐकल्यावर चिमडमहाराजांना माईसाहेबांच्या समजूतदारपणाचे फारच कौतुक वाटले व ते त्यांनी व्यक्त केले.

### चिमडमहाराजांचे निर्याण

साधुमहाराजांचा रथोत्सव पार पडताच चिमडमहाराजांनी दुखण्याचे मिष घेतले. तसे पाहिल्यास त्यांच्या प्रकृतीत फार मोठा बिघाड झाला होता, असे दिसत नव्हते. परंतु आता त्यांनी निर्याण करण्याचे ठरविले असल्यामुळे, त्यांनी आजाराचा बहाणा केला. वैद्याने येऊन प्रकृति तपासली तर काही दुखणे दिसत नसे. पण वैद्य परत गेले की चिमडमहाराज आजाराचे काहीतरी लक्षण दाखवीत. हळुहळु ते बिछान्यावर पडून राहू लागले. आणि अशा स्थितीत शुक्रवार, मार्गशीर्ष शुद्ध ११, शके १८१३ (इ.स.१८९१) रोजी रात्री पावणे दहाच्या सुमारास चिमडमहाराजांनी शेवटचा श्वास सोडला, आणि त्यांचा आत्मा भौतिक देहातून बाहेर पडून आत्मारामात मिसळून गेला.

आपल्या पतीच्या निर्याणाची कल्पना जरी माईसाहेबांना होती, तरी प्रत्यक्ष निर्याण झाल्यावर माईसाहेबांना धक्का बसला असल्यास, त्यात नवल वाटण्याचे कारण नाही. तथापि अंगात परमार्थ मुरला असल्याने, त्यांनी स्वतःला आणि मुलांना सावरले आणि भविष्याकडे नजर लावली. पुढे यथावकाश केशवपनाच्या दिव्याला त्यांना सामोरे जावे लागले. तर इकडे चिमड मठाच्या अधिपतीची प्रतिनिधि या स्वरूपात लक्ष्मीबाई अक्का मठाचा कारभार पाहू लागल्या. चिमडमहाराज विद्यमान असतानाही त्यांच्या आज्ञेने माईसाहेब स्त्रियांना अनुग्रह देत होत्या. आता लक्ष्मीबाई अक्का प्रतिनिधि झाल्यावरही स्त्रियांना अनुग्रह देण्याची प्रथा माईसाहेबांनी चालूच ठेवली.

■■■

## प्रकरण तिसरे

चिमडमहाराज निर्याणास गेले. त्यावेळी लक्ष्मीबाई अक्कांना चिमडास येऊन काही वर्षे लोटली होती. आता त्यांना निंबरगीची ओढ वाटू लागली. त्यानुसार निंबरगीस जाऊन निंबरगीकरमहाराजांच्या समाधीचे दर्शन घेऊन यावे असे त्यांना वाटू लागले.

### लक्ष्मीबाई अक्कांची निंबरगी यात्रा

चिमडमहाराजांचे चिरंजीव दाजीबा यांचा विवाह झाला होता. तेव्हा दाजीबा व त्यांची पत्नी या दांपत्यास बरोबर घेऊन निंबरगीची यात्रा करावी असे लक्ष्मीबाई अक्कांनी ठरविले. हा बेत त्यांनी कोटणीसमहाराज आणि माईसाहेब यांचे कानांवर घातला. त्यांना तो पसंत पडला. त्यानुसार दाजीबा व त्यांची सौभाग्यवती, लक्ष्मीबाई अक्का, माईसाहेब, दाजीबांचे श्वशुर कोटणीसमहाराज आणि अन्य काही असे मिळून निंबरगीस गेले. तेथे दाजीबा व त्यांची पत्नी या बालदांपत्याने जोडीने निंबरगीकरमहाराजांच्या समाधीची यथासांग पूजा केली आणि सर्वजण चिमडास परतले. नंतर लक्ष्मीबाई अक्का व माईसाहेब यांची परवानगी घेऊन, बेळगावात वकिली करणाऱ्या कोटणीसमहाराजांनी दाजीबा व नारायण यांना शिक्षणासाठी आपल्या जवळ बेळगावास ठेवून घेतले.

### लक्ष्मीबाई अक्कांचे निर्वाण

आत्तापर्यंत साधुमहाराज, निंबरगीकरमहाराज आणि चिमडमहाराज यांची निर्वाणे झाली होती. आत्ता लक्ष्मीबाई अक्कांचेही निर्याण जवळ आले होते. हे तिघेही त्यांना प्रिय होते. त्यांच्या देहत्यागाने नाही म्हटले तरी विचारी आणि परमार्थी लक्ष्मीबाई अक्कांना कमीजास्त बोच लागली असणारच. माईसाहेबांनाही तसेच झाले असणार. आता माईसाहेबांना लक्ष्मीबाई अक्कांच्या निर्याणाला सामोरे जाण्याची पाळी आली.

लक्ष्मीबाई अक्का ज्यावेळी निंबरगीहून चिमडास यरगट्टीकर कुटुंबात रहाण्यास आल्या, त्यावेळी त्या एका दृष्टीने या कुटुंबात परक्याच होत्या. तथापि आपल्या समजुतदार, प्रेमळ, आणि आपुलकीच्या वागण्याने या कुटुंबात त्या परक्या न रहाता, त्या त्या कुटुंबाचा एक घटकच झाल्या होत्या. आणि त्या वडिलधाऱ्या आणि परमार्थी असल्याने चिमडमहाराजांनी माईसाहेबांच्या संमतीने त्यांना मठपतीचे प्रतिनिधित्व दिले

होते. चिमडमहाराजांच्या सांगण्याप्रमाणे त्यांनी चार वर्षे चिमड मठाचा कारभार तोलामोलाने व फार चांगल्या रीतीने सांभाळला होता. त्यानंतर चिमडमहाराजांचे ज्येष्ठ चिरंजीव दाजीबा ऊर्फ दाजीसाहेब हे वयात आले होते. ते आता चिमडमठाचा कारभार यशस्वीपणे हाताळू शकतील असे लक्ष्मीबाई अक्कांच्या निदर्शनास आले होते. तेव्हा इ.स.१८९५ हे वर्ष लागताच त्यांनी देह ठेवण्याचा विचार केला.

मग त्यांनी आपल्या निकटवर्तीयांना सांगितले की या वर्षाच्या आश्विन शुद्ध प्रतिपदेला मी देह ठेवणार आहे. त्यांचे काही भक्त व कोटणीसमहाराज यांना ही वार्ता कळली. लक्ष्मीबाई अक्कांनी पूर्वी कोटणीसमहाराजांना नागोदराच्या दुर्धर व्याधीतून आपल्या कृपेने वाचविले होते. त्यामुळे त्यांना लक्ष्मीबाई अक्कांबद्दल अपार आदर आणि कृतज्ञता होती. ही वार्ता कळली तेव्हा ते सांगलीस होते. ते लगबगीने चिमडास आले. काही निष्ठावंत भक्त आणि कोटणीसमहाराज यांनी लक्ष्मीबाई अक्काजवळ आग्रह आणि हट्ट धरला की अक्कांनी इतक्या लौकर निर्याणाला जाऊ नये. त्यांचा हट्ट व आग्रह पाहून लक्ष्मीअक्कांचे मन बदलले. मग त्या म्हणाल्या, '' अहो, तुमचा हट्ट पाहून मी आत्तापुरते माझे निर्याण पुढे ढकलते. पण आता एक लक्षात ठेवा. आणखी फक्त दोनच वर्षे मी या मृत्युलोकावर राहीन. त्यानंतर कुणीही आणि कितीही आग्रह, हट्ट, रदबदली केली तरी मी ऐकणार नाही हे मात्र लक्षात ठेवा.'' त्यानंतर इ.स. १८९७ च्या आश्विन महिन्यात देह ठेवण्याचा विचार लक्ष्मीबाई अक्कांनी पक्का केला.

लक्ष्मीबाई अक्कांनी यापूर्वीच दाजीसाहेबांना निंबरगीकरमहाराजांचे चिरंजीव भीमाण्णामहाराज यांचेकडून उपदेशानुग्रह करविला होता. आता त्यांनी दाजीसाहेबांना आपल्याजवळ बोलावून घेतले आणि त्यांना आवश्यक ती सर्व माहिती करून दिली. आणि मग मठाचा सर्व कारभार त्यांच्याकडे सोपविला, भक्तमंडळींना बोलावून सांगितले, ''यापुढे दाजीसाहेब हेच या चिमड मठाचे अधिपति आहेत. ते संप्रदायाचे नेतृत्व कुशलतेने करू शकतील अशी माझी खात्री पटलेली आहे. तेव्हा यापुढे तुम्ही सर्वांनी त्यांना विचारावे आणि त्यांच्या मर्जीबाहेर आणि आज्ञेबाहेर जाऊ नये.'' चिमडमहाराजांचे दुसरे चिरंजीव नारायणराव यांचा निरोप घेतला. माईसाहेबांना तर त्यांनी अगोदरच कल्पना देऊन ठेवली होती.



लक्ष्मीबाई अक्कांनी दिलेली दोन वर्षांची मुदत संपली होती. इ.स. १८९७ चा आश्विन महिना लागण्यापूर्वी लक्ष्मीबाई अक्कांची प्रकृति बिघडलेली दिसू लागली. पण त्यांच्या तब्येतीचे मान वैद्यांना लागेना. घटकेत त्या उत्साहाने वागत तर दुसऱ्या घटकेला त्यांची प्राणांतिक अवस्था होई. व त्या निजून रहात. आश्विन शुद्ध प्रतिपदेला त्यांनी निर्वाण करण्याचे ठरविले होते. पण त्या दिवशी माईसाहेब अस्पर्श झाल्या. ते कळताच लक्ष्मीबाई अक्कांनी त्या दिवशीचे निर्वाण पुढे ढकलले. त्यानंतर त्याच सालच्या आश्विन शुद्ध तृतीयेला सकाळी दहा वाजता सर्वांना सांगून सवरून एकाद्या गावाला जाण्यास निघावे त्याप्रमाणे, निंबरगीकरमहाराजांच्या नारायणनामाचे स्मरण करीत, लक्ष्मीबाई अक्का नारायणरूप होऊन गेल्या. मरण संतांच्या ताब्यात असते याचे ढळढळीत उदाहरण म्हणजे लक्ष्मीबाई अक्कांचे निर्वाण. त्यांच्या निर्वाणाने चिमड मठावर आणि चिमड गावावर शोकाची अवकळा पसरली. पुढे त्यांच्या पार्थिव देहाचे दहन होऊन यथावकाश चिमड मठाच्या परिसरात त्यांची समाधि बांधली गेली.

लक्ष्मीबाई अक्कांच्या म्हणण्याप्रमाणे आता दाजीसाहेब भारदस्तपणे मठाचा कारभार पाहू लागले होते. मातोश्री माईसाहेबांच्या कृपाछत्राखाली त्यांचे व्यवस्थित चालले होते. उपदेशानुग्रह मागावयास येणाऱ्या स्त्रीपुरुषांना ते अनुग्रह देत. काही स्त्रिया मात्र आवर्जून माईसाहेबांचेकडून अनुग्रह घेत.

## दाजीसाहेबांचे निर्वाण

काळाच्या गतीनुसार इ.स. १९०० साल आले. या वर्षाच्या ऑगस्ट महिन्यात दाजीसाहेबांची प्रकृति बिघडली. त्यांना बारीक ताप येऊ लागला. आणि तथापि तिकडे दुर्लक्ष करून दाजीसाहेबांनी आपल्या दैनिक कार्यक्रमात खंड पडू दिला नाही. रोजचे स्नान व आन्हिक, देवपूजा, संध्याकाळचे पोथीवाचन इत्यादि रोजचे कार्यक्रम त्यांनी चालूच ठेवले. प्रारंभी काही दिवस माईसाहेबांनी घरगुती उपाय केले. पण त्यांचा इष्ट परिणाम दिसून आला नाही. ऑगस्ट महिन्याच्या वीस तारखेच्या सुमारास दाजीसाहेबांच्या खाकऱ्यातून रक्त पडू लागले आणि त्यांची प्रकृति अधिकच बिघडली.

दाजीसाहेबांचे श्वशुर कोटणीसमहाराज हे सांगलीस रहात होते. त्यांना दाजीसाहेबांच्या प्रकृतिबद्दल कळविण्यात आले. तेव्हा त्यांनी आपले बंधु पुंडलीकराव व कारकून नानबा फडणीस यांना चिमडास पाठविले. त्यांना दाजीसाहेबांची प्रकृति अत्यंत बिघडलेली आढळली. तसे त्यांनी कोटणीसमहाराजांना सांगितले. तेव्हा सांगलीतील

सुप्रसिद्ध वैद्य आबासाहेब सांभारे यांना बरोबर घेऊन कोटणीसमहाराज चिमडास पोचले. सांभारे वैद्यांनी दाजीसाहेबांची तपासणी केली. त्यांना दाजीसाहेबांचे चिन्ह फारसे ठीक दिसले नाही. पण तसे न सांगता, ''औषध पाठवून देतो'' असे सांगून ते तेरदळ गावी निघून गेले. त्याच रात्री दाजीसाहेबांची प्रकृति विकोपास गेली आणि पहाटेच्या सुमारास त्यांना ऊर्ध्व लागला. आणि २८ ऑगस्ट १९०० रोजी सकाळी नऊचे सुमारास दाजीसाहेबांचा देहांत झाला. त्यावेळी साधुमहाराज आणि चिमडमहाराज यांच्या नावाचे जे दोन वृक्ष मठाच्या परिसरात होते, त्यावरील सर्व पाने एकदम अचानकपणे गळून पडली. माईसाहेब एवढ्या धीराच्या पण त्यांनाही जाणवण्याजोगा हा धक्का होता. मुख्य म्हणजे त्यांचे सांत्वन करण्यास कोणीही वडिलधारे माणूस जवळ नव्हते.

## नारायणमहाराज मठाधिपति

दाजीसाहेबांनी महाप्रयाण केले. त्यांना पुत्र वा अन्य अपत्य नव्हते. त्यामुळे त्यांचा वारस मठपति होण्याची शक्यता नव्हती. दाजीसाहेबांचे धाकटे बंधु नारायणराव हे त्यावेळी मठातच रहात होते. तेव्हा त्यांनाच मठाधिपति करण्याचे माईसाहेबांनी ठरविले. तेव्हा मठातील सर्वात ज्येष्ठ आणि श्रेष्ठ अशा माईसाहेबांनी नारायणरावांना मठपति म्हणून घोषित केले आणि तसे सर्व भक्तमंडळींना सांगितले. माईसाहेबांनी नारायणरावांना मठाचा कार्यभार स्वीकारण्याची आज्ञा केली. त्यानुसार नारायणराव- आता नारायणमहाराज- हे जबाबदारीपूर्वक मठाचा कारभार पाहू लागले.

## नारायणमहाराजांचा विवाह

यासमयी नारायणमहाराज विवाह योग्य वयात आले असल्याने माईसाहेबांनी त्यांचा विवाह उरकून घेण्याचे ठरविले. नारायणमहाराजांच्या पहिल्या पत्नीला अंबुताई नावाची एक मुलगी होती. ती कोटणीसमहाराजांचे भाचे श्री. बापूराव कुलकर्णी यांना विवाहामध्ये दिली होती. नारायणमहाराजांची पहिली पत्नी अकाली निवर्तली. त्यामुळे त्यांचा दुसरा विवाह करण्यात आला. त्याकाळी तेरदळ गावी रामाप्पा बेळगली या नावाचे एक वकिल होते. त्यांना गंगाबाई नावाची कन्या होती. तिच्याबरोबर नारायणमहाराजांचा दुसरा विवाह झाला. या पत्नीपासून प्रथम त्यांना कमल नावाची मुलगी आणि रामचंद्र ऊर्फ बाबूराव अशी अपत्ये झाली. परंतु ही दोन्हीही अपत्ये अल्प वयातच देवाघरी गेली. त्यानंतर नारायणमहाराजांना विश्वनाथराव ऊर्फ पंडितराव, बळवंतराव, नीलकंठराव, गंगाधरराव आणि सदाशिवराव असे पुत्र झाले. पंडितराव हे चिमडच्या पोस्ट ऑफीसात नोकरी करीत. बाकीचे चिरंजीव मठाची शेतीभाती,मळे इत्यादीकडे लक्ष पुरवीत.



## नारायणमहाराजांना अनुग्रहाची आज्ञा

नारायणमहाराज मठपति झाले तरी प्रारंभी ते उपदेशानुग्रह देण्याचे टाळीत. पण एका घटनेनंतर ते अनुग्रह देऊ लागले. ही घटना अशी होती :- सांगली गावात माधवराव उकिडवे नावाचे एक सराफ होते. त्यांना साधुमहाराजांचा दृष्टांत झाला होता की त्यांनी चिमडमठाच्या अधिपतीकडून अनुग्रह घ्यावा. या दृष्टांताप्रमाणे ते चिमडास गेले आणि मठाधिपति नारायणमहाराज यांचेकडे उपदेशानुग्रह मागितला. नारायणमहाराजांनी तिकडे दुर्लक्ष केले. असे दोन-तीनदा झाल्यावर उकिडवे माईसाहेबांच्याकडे गेले आणि त्यांनी साधुमहाराजांचा दृष्टांत व आपली इच्छा त्यांचे कानावर घातली. माईसाहेबांना नारायणमहाराजांचा पारमार्थिक अधिकार माहीत होता. म्हणून त्यांनी नारायणमहाराजांना उपदेशानुग्रह देण्यास प्रारंभ करण्याची आज्ञा दिली. त्यांची आज्ञा शिरोधार्य मानून त्यांनी माधवराव उकिडवे यांना अनुग्रह दिला आणि तेव्हापासून मुमुक्षूला उपदेशानुग्रह देण्याचे कार्य सुरू केले. तथापि माईसाहेब विद्यमान असेपर्यंत, ज्या स्त्रिया नारायणमहाराजांचा अनुग्रह मागण्यास येत त्यांना नारायणमहाराज माईसाहेबांकडून अनुग्रह देववीत, हे लक्षात ठेवण्यासारखे आहे.

## कोटणीसमहाराजांना प्रसाद भेट

चिमडमहाराजांचे शिष्य कोटणीसमहाराज हे ग्रामांतरे करीत शेवटी इ.स. १९०० मध्ये ते सांगली गावी स्थिरावले होते. चिमडमहाराजांच्या आज्ञेप्रमाणे ते रोज हरिकीर्तन करीत. दासबोधाची पोथी पुढे ठेवून त्यांची कीर्तने चालत. आपल्या पतीचे एक श्रेष्ठ भक्त कोटणीस हे सांगलीत कीर्तने करतात हे माईसाहेबांना ज्ञात होते. इ.स. १९०६ साली माईसाहेब काही कारणांनी सांगलीस आल्या होत्या. सांगलीत असेपर्यंत त्या कोटणीसमहाराजांच्या कीर्तनात उपस्थित रहात. कोटणीसमहाराजांच्या कीर्तन समयी सद्गुरूंचे काही प्रतीक नाही ही गोष्ट त्यांच्या लक्षात आली. त्यावेळी चिमडमहाराजांची एकादी वस्तु भेट म्हणून कोटणीसमहाराजांना देण्याचे त्यांच्या मनात आले. तेव्हा त्या कोटणीसमहाराजांना म्हणाल्या, ''अहो कोटणीस, चिमडमहाराजांच्या पादुका तुम्हाला प्रसाद म्हणून देण्याचे माझ्या मनात आले आहे. तेव्हा येत्या मार्गशीर्षात

जेव्हा तुम्ही चिमडमहाराजांच्या आराधनेला चिमडला याल त्यावेळी मी तुम्हाला तो पादुकांचा प्रसाद देईन.'' माईसाहेबांचे हे वचन ऐकताच कोटणीसमहाराजांना अत्यानंद झाला. केव्हा एकदा मार्गशीर्ष उजाडतो, आपण आराधनेस चिमडला जातो आणि पादुका स्वीकारतो, असे त्यांना झाले. पुढे मार्गशीर्ष मासात चिमडमहाराजांच्या आराधनेस कोटणीसमहाराज गेले असता, मार्गशीर्ष शुद्ध १४ या शुभ दिनी माईसाहेबांनी कोटणीसमहाराजांना पादुकांचा जोड प्रसाद म्हणून दिला. कोटणीसमहाराज हर्षोत्फुल्ल झाले.

### उद्धवरावजींचा विवाह

चिमडमहाराजांचे तिसरे चिरंजीव उद्धवराव नावाचे होते. काही काळ सांगलीस शिक्षणासाठी राहिले होते. त्यांचा वेश अगदी साधा असे. त्यांचा चेहरा प्रसन्न असे. ते फार कमी बोलत. माईसाहेबांनी त्यांना शिवरामबुवा ब्रह्मचारी यांचेकडून अनुग्रह देवविला होता. माईसाहेब व नारायणमहाराज जवळच्या नातेवाईकांना अनुग्रह देत नसत. अनुग्रह होताच उद्धवरावांना लगेच समाधीच लागली होती. त्यानंतर त्यांनी सतत साधनाचा अभ्यास करून परमार्थातील पूर्णता प्राप्त करून घेतली होती. त्यांना ज्योतिषाचेही ज्ञान होते. ते कोणालाही उपदेशानुग्रह देत नसत.

इ.स. १९०८ साली उद्धवरावजींचे लग्नाचे वय झाले आहे, हे पाहून माईसाहेबांनी त्यांचा विवाह करण्याचे मनात आणले. त्याप्रमाणे वधूसंशोधन करण्यास सुरुवात झाली. कोटणीसमहाराजांचे श्यामराव कुलकर्णी या नावाचे मेहुणे होते. त्यांची सुकन्या उद्धवरावांची वधू म्हणून नेमस्त करण्यात आली. आणि इ.स. १९०८ साली उद्धवरावांचा विवाह सोहळा माईसाहेबांनी पार पाडला. पुढे उद्धवरावजींना एक मुलगी व दोन मुलगे अशी संतति झाली.

### चिमडमठावरील गंडांतर टळले

इ.स. १९०७ चे सुमारास कोटणीसमहाराजांनी चिमड मठात काही बांधकाम केले होते. त्यावेळी चिमड मठात एक पाच खणांचे दुपाकी स्वयंपाकघर, त्याला लागून तीन खणांचा सोपा आणि त्यालाच लागून दोन खणांची एक खोली होती. सर्व इमारतीवर एक जुने माळवद होते. हे बांधकाम नवीन परिस्थितीत फारच अपुरे होते. म्हणून ते सर्व उलगडून एक नवीन इमारत कोटणीसमहाराजांनी बांधवून घेतली होती.



त्यानंतर काही काळाने पोलीस सुपरिंटेंडट ग.रा.आपटे, श्री.कृष्णाजीपंत मोघे व त्यांचे स्नेही या मंडळींनी चिमड मठाजवळ धर्मशाळा इत्यादि बांधकाम करण्याचे ठरविले आणि नारायणमहाराजांच्या परवानगीने हे बांधकाम पूर्ण झाले. यानंतर मात्र ग.रा.आपटे यांनी 'चिमडमठ ही सार्वजनिक संस्था ठरवावी' अशा आशयाचा अर्ज जमखंडी सरकारकडे गुदरला. हे कळताच माईसाहेब व नारायणमहाराज हे दोघेही चिंतेत पडले. मठ जर खाजगी न रहाता सार्वजनिक झाला असता तर संपूर्ण मालमत्तेसह चिमड मठ माईसाहेब व चिमडमहाराज यांच्या हातातून गेला असता. आपटे यांच्या तक्रारीवर जमखंडी सरकारात बरीच वर्षे काम चालले आणि शेवटी इ.स. १९२० मध्ये निकाल लागला. त्या निकालानुसार सर्व मालमत्तेसह चिमड मठ ही खासगी मालमत्ता ठरली. आपल्या पतीच्या, साधुमहाराजांच्या आणि निंबरगीकरमहाराजांच्या कृपेचे माईसाहेबांना कौतुक वाटले.

### माईसाहेबांचे जावई सिद्धगिरीस

इ.स.१९२० च्या प्रारंभास कोटणीसमहाराजांच्या बाबूराव या पुत्राच्या लग्नाची वाटाघाट होऊन लग्न ठरले होते. या लग्नाच्या ऐन संधीस असे घडले :- कोटणीसमहाराजांचे चुलत बंधु आणि माईसाहेबांचे जावई श्री. गोपाळकाका हे अचानकपणे चिमड, सांगली अगर मुधोळ येथे कोणत्याही नातेवाईकाला काही न सांगता, चिमड मठातून निघून गेले. त्यांचा जवळपास शोध लागला नाही. सर्वजण चिंतेत पडले. पुढे कळले ते असे :- गोपाळकाका हे कोल्हापूरजवळील सिद्धगिरि येथील काडसिद्धांचे स्थानी गेले होते. तेथे त्यांनी एकवीस दिवस तीव्र अनुष्ठान केले. ही गोष्ट कळताच चिमडहून माईसाहेब स्वतः त्यांना भेटण्यास सिद्धगिरीला गेल्या. आणि तेथेच त्यांनी अनुष्ठानाचे उद्यापन मोठ्या समारंभाने केले, आणि गोपाळरावांना घेऊन माईसाहेब चिमडास परतल्या.

### गोपाळरावांचे आणखी एक अनुष्ठान

इ.स.१९२३ सालच्या एप्रिल महिन्यात माईसाहेबांचे जावई गोपाळराव हे पुनः एकदा मुधोळ, सांगली व चिमड येथे कुणालाही न सांगता, मठ सोडून बाहेर पडले. बरेच दिवस त्यांचा काही थांगपत्ता लागला नाही. माईसाहेबांसकट सर्वजण काळजीत पडले. नंतर कळले ते असे :- अहमदनगरजवळ भिंगार या नावाचे गाव आहे. त्या गावाच्या ईशान्य दिशेला सुमारे १४ कोसांवर वृद्धेश्वर देवाचे पुरातन स्थान आहे. या

ठिकाणी चौफेर डोंगराचा फेर असून मध्यभागी शंकराचे प्रचंड प्राचीन देवालय आहे. या मंदिरात राहून गोपाळरावांनी एकवीस दिवस खडतर अनुष्ठान केले. एकविसाव्या दिवशी त्यांनी निर्वाण केल्यावर त्यांना शंकराचा सगुण साक्षात्कार झाला. त्यानंतर गोपाळराव परत आले. सर्वांना हायसे झाले.

### निंबरगीची यात्रा

निंबरगीकरमहाराजांच्या कृपाप्रसादाने चिमड मठाची भरभराट होत होती. त्यांच्या प्रसादाचे फळ म्हणून चिमड मठ खासगी ठरून नारायणमहाराज व माईसाहेब यांचा खाजगी ठरला होता. निंबरगीकरमहाराजांचे दर्शन माईसाहेबांना झाल्यामुळे त्यांच्या एका पुत्राचे नाव नारायण असे ठेवण्यात आले होते. साहजिकच एकदा निंबरगीस जाऊन, सहकुटुंब निंबरगीकरमहाराजांच्या समाधीचे दर्शन घ्यावे अशी उत्कट इच्छा नारायणमहाराजांच्या मनात आली. ती त्यांनी माईसाहेबांना सांगितली. माईसाहेबांनी मोठ्या आनंदाने त्यास अनुमति दिली. ही यात्रा इ.स.१९२२ साली झाली. माईसाहेब इत्यादि मठातील मंडळीसह नारायणमहाराज निंबरगीस निघाले. नारायणमहाराजांच्या आग्रहानुसार सांगलीचे कोटणीसमहाराजांनीही या यात्रेत सहभाग घेतला होता. ही निंबरगीची यात्रा यथासांगपणे पार पडली. परमगुरूंच्या समाधि-दर्शनाने माईसाहेब आनंदित झाल्या.

### कोटणीसमहाराजांचे गंडांतर दूर केले

माईसाहेबांचे श्वशुर कोटणीसमहाराज हे सांगलीत रहात होते. इ.स. १९२३ सालच्या सुमारास त्यांची साठी जवळ आली होती. आता देह ठेवावा असे त्यांच्या मनात आले. त्या विचाराला अनुसरून ते २०-२३ डिसेंबरच्या दरम्यान चिमडला पोचले. २३ डिसेंबरला रात्री शेगडीपुढे शेकत बसले असताना त्यांना एकाएकी झीट आली आणि ते पाठीवर पडून बेशुद्ध झाले. शेजारीच त्यांचे स्नेही नाना फडणीस होते. त्यांनी इतरांना हा प्रकार सांगितला तेव्हा नातेवाईक आणि नारायणमहाराज व माईसाहेब लगेच कोटणीसमहाराजांच्या जवळ आले. हेमगर्भाची मात्रा आणवून माईसाहेबांनी ती कोटणीसमहाराजांच्या मुखात आल्याचे रसातून घातली पण ती आत न जाता बहुतेक सगळी बाहेरच परतून आली. सर्वजण चिंतातुर होते. तेव्हा माईसाहेबांनी कृपा केली. त्यांच्या कृपादृष्टीचा प्रभाव पडला आणि कोटणीसमहाराज शुद्धीवर आले. त्याच रात्री मठातील एक म्हशीचे रेडकू काही विकार नसताना अकस्मात् मरून पडले. ते कळताच



माईसाहेब उद्गारल्या, ''बरे बाबा, रेडकावरच निभावले. आत्ता हणमंतरावजींचे गंडांतर टळले.''

### उद्धवरावजींचे महानिर्वाण

आपले पति चिमडमहाराज, त्यांच्या गुरुभगिनी लक्ष्मीबाई अक्का, आपले चिरंजीव दाजीसाहेब यांचे देहांत पाहण्याची पाळी माईसाहेबांवर आली होती. आता आणखी एक मृत्युप्रसंग पहाण्याची पाळी त्यांच्यावर आली. हे मरण म्हणजे उद्धवरावजींचे निर्वाण.

उद्धवरावजी हे माईसाहेबांचे तिसरे चिरंजीव. त्यांनी आता निर्वाण करण्याचे ठरविले होते. साधुमहाराजांची अनुज्ञा घेऊन, उद्धवरावजींनी महाप्रयाण करण्याचे निश्चित केले होते. त्या सुमारास माधवराव उकिडवे हे चिमडास येऊन परत निघाले होते. त्यांना उद्धवराव म्हणाले, ''तुम्ही आणखी आठ दिवस येथे रहाल काय?'' तसे करणे उकिडवे यांना शक्य नव्हते. ते परत निघून गेले. त्यानंतर बरोबर आठव्या दिवशी मार्गशीर्ष शुद्ध षष्ठी इ.स.१९३२ या दिवशी उद्धवरावजींनी महाप्रस्थान केले. माईसाहेबांवर आणखी एक दुःखाचा प्रसंग ओढवला. सर्व मठात शोककळा पसरली. पण नियतीपुढे कोणाचे चालते?

उद्धवरावजींचे निर्वाणानंतर, ''चिमडचा आत्मा गेला'' असे उद्गार चिमडचे लोक काढू लागले. त्या चिमडच्या लोकांनीच नंतर स्वखर्चाने स्वयंस्फूर्तीने उद्धवरावजींची समाधी चिमड मठाच्या परिसरात बांधवून घेतली.

### माईसाहेबांचे सांगलीत पुनरागमन

माईसाहेब प्रथम १९०६ या साली सांगलीस आल्या होत्या. आता इ.स. १९३८ चे सुमारास त्या पुनः एकदा काही दिवस रहाण्यास सांगलीत आल्या होत्या. इ.स. १९०६ साली सांगलीत माईसाहेबांच्या पतींचे शिष्य कोटणीसमहाराज नित्य कीर्तन करीत होते. त्यांची कीर्तने माईसाहेबांनी ऐकली होती. इ.स. १९३८ मध्ये माईसाहेबांचे चिरंजीव नारायणमहाराज यांचे शिष्य जे गोविंद अ.केळकर ऊर्फ श्रीमामामहाराज, त्यांचे नित्य कीर्तन चालू होते. मामामहाराज हे कोटणीसमहाराजांच्या आज्ञेनुसारच नित्य कीर्तनाची परंपरा चालवीत होते. तेव्हा माईसाहेब या मामामहाराजांच्या कीर्तनास जाऊ लागल्या. यावेळी माईसाहेबांना असे कळले की मामामहाराज हे

परमार्थात पूर्ण आणि उपदेश देण्याचे अधिकारी असूनही ते उपदेश देत नाहीत. ते माईसाहेबांना खटकले. त्या मामामहाराजांना म्हणाल्या, ''बापूराव, आता जर कोणी तुमचेकडे अनुग्रह मागितला तर नाही म्हणू नका. तुम्ही आता उपदेशानुग्रह देण्यास प्रारंभ करा.''

याच मामामहाराजांचे चिरंजीव श्रीदासराममहाराज होत. त्यांना कोटणीसमहाराजांनी त्यांच्या वयाच्या चौदाव्या दिवशी दृष्टिद्वारा अनुग्रह दिला होता. त्याचे राम हे नाव ठेवण्यास सांगितले होते, आणि हा राम अगदी बालपणापासून हरिकीर्तन करू लागेल. असे आशीर्वचन दिले होते. त्यांच्या आशीर्वादानुसार दासराममहाराज हे वयाच्या पाचव्या वर्षीपासूनच कीर्तने करू लागले होते. आपल्या पित्याप्रमाणेच दासराम हेही परमार्थातील अधिकारी सत्पुरुष होते. माईसाहेब सांगलीत असताना त्यांना दासराममहाराजांची एक दोन कीर्तने श्रवण करण्याची संधि प्राप्त झाली होती. त्यांना त्यांची कीर्तने फारच आवडली होती.

### दासराममहाराजांचे चिमड मठात कीर्तन

माईसाहेब काही दिवसांनी चिमडास परत गेल्या. पुढे इ.स. १९३९ साली दासराममहाराज हे साधुमहाराजांच्या रथोत्सवासाठी चिमडास गेले होते. माईसाहेबांना आनंद झाला. या दासरामांचे एक कीर्तन रथोत्सव काळात आयोजित करावे, असे माईसाहेबांनी आपले पुत्र नारायणमहाराज यांना सांगितले. मातोश्रींची आज्ञा शिरसावंद्य मानून, नारायणमहाराजांनी दिवाळी पाडव्याला सकाळच्या वेळी दासराममहाराजांचे कीर्तन आयोजित केले. (कारण संध्याकाळी त्यांचे कीर्तन असे.) दासरामांच्या या कीर्तनास स्वतः माईसाहेब व नारायणमहाराज उपस्थित होते. निंबरगीकरमहाराजांचे नातू श्रीनागाप्पाण्णामहाराज हे रथोत्सवास निंबरगीहून चिमडास आले होते; तेही या कीर्तनात उपस्थित होते. या सर्वांना दासराममहाराजांचे कीर्तन फार आवडले. दासराममहाराजांच्या कीर्तनात आलेला एक विषय तर नारायणमहाराजांनी आपल्या संध्याकाळच्या कीर्तनात फारच रंगवून सांगितला. हा विषय होता :-''पांढऱ्या कापसाच्या गोळ्याला लोण्याचा गोळा समजून, तो गोळा आपणास मिळेल, या आशेवर एक बांधून ठेवलेले मांजर काही न खाता पिता जिवंत राहिले.''

### माईसाहेबांचे महानिर्याण

काळाचा प्रवाह सातत्याने पुढे पुढेच जात असतो. या काळाच्या ओघात



माईसाहेबांच्या आयुष्याची शंभरपेक्षा अधिक वर्षे लोटली. आता इ.स.१९४२ हे वर्ष सुरू झाले होते. नारायणमहाराजांनी म्हटल्याप्रमाणे, आत्तापर्यंतच्या दीर्घ आयुष्यात माईसाहेबांना सर्दीपडसे याखेरीज अन्य काही गंभीर आजार झालेला नव्हता. त्या सदोदित आपल्या कर्तव्यकर्मातच गुंतलेल्या असत. तथापि जसजसे दिवस जातात तसतसा माणसाचा पांचभौतिक देह कुरकुर करू लागतो आणि क्षीण होऊ लागतो. तो निसर्गाचा नियमच आहे. या नियमाप्रमाणे इ.स.१९४२ साली माईसाहेबांचा देह जराजर्जर झाला. त्यांच्या हातापायातील शक्ति कमी होत गेली होती. आणि या साली तर त्यांना अंथरूणावरच पडून रहावे लागले, इतके त्यांचे शरीर विकलांग झाले. त्यावेळी नारायणमहाराज आणि त्यांच्या पत्नी माईसाहेबांची काळजी घेऊ लागले आणि त्यांना काय हवे आणि नको ते पाहू लागले. नारायणमहाराज तर आपल्या दैनंदिन कार्यक्रमातून वेळात वेळ काढून, दर तासाला माईसाहेबांकडे येत आणि त्यांची प्रकृति पाहून जात. त्यावेळी माईसाहेबांच्या चेहऱ्यावर प्रसन्न हास्य असे.

इ.स. १९४२ चा माघ महिना सुरू झाला. या महिन्यात बुधवार, माघ वद्य ११, फेब्रुवारी ११, इ.स. १९४२ या एकादशीचे दिवशी सायंकाळी पाच वाजता, आपले गुरु साधुमहाराज व आपले पति चिमडमहाराज यांना वंदन करून आणि रामाचे स्मरण करीत माईसाहेबांनी महाप्रयाण केले. आणि त्या रामरूपात एकरूप झाल्या. त्याच क्षणी साधुमहाराजांच्या मंदिरात ज्या साधुमहाराजांच्या पादुका होत्या त्या उचकटून पडल्या. साधुमहाराज आपल्या प्रिय शिष्य माईसाहेब यांच्या स्वागतासाठी त्यांना सामोरे आले होते. त्याचवेळी इकडे दूरच्या नरसोबावाडीत एक घटना घडली. सांगलीजवळ नरसोबावाडी हे नृसिंह सरस्वतींचे देवस्थान आहे. वरील दिवशीच दासरामांचा विवाह सीतावहिनींशी झाला होता. आणि विवाहानंतरच्या वरातीसाठी दासराममहाराज टांग्यामध्ये चढत होते. तोच काही भौतिक कारण नसताना त्यांच्या गळ्यातील पुष्पहार आपोआप तुटून गळून पडला. तत्काळ दासराममहाराज उद्गारले, ''चिमडास माईसाहेबांचे निर्वाण झाले.'' सांगलीत परतल्यावर त्यांना अधिकृत वार्ता कळली.

### माईसाहेबांची अंत्ययात्रा

माईसाहेबांचे निर्वाण झाल्यावर त्यांच्या अंत्ययात्रेची तयारी सुरू झाली. माईसाहेबांच्या दुःखद महानिर्वाणाची वार्ता चिमडात कळताच, त्यांची भक्तमंडळी धावतच चिमड मठात जमली. त्या सर्वांना माईसाहेबांनी आपुलकी आणि आईप्रमाणे

प्रेम दिले होते. माईसाहेबांच्या चरणकमलावर डोके ठेवून त्यांना वंदन करावे आणि त्यांच्या अंत्य पालखीला खांदा द्यावा. पण ते जमणार कसे? कारण माईसाहेब होत्या ब्राह्मणकुळातील आणि ते होते ब्राह्मणेतर. तथापि त्यांनी धीर करून नारायणमहाराजांना म्हटले, ''महाराज, माईसाहेब जशा तुमच्या मातोश्री होत्या तशाच त्या आमच्याही मातोश्री होत्या. त्यांनी जन्मभर आम्हाला आईचे प्रेम दिले. तेव्हा माईसाहेबांच्या पायांना स्पर्श करून त्यांना वंदन करण्याची आणि त्यांच्या अंतिम यात्रेत त्यांना खांदा देण्याची परवानगी आपण आम्हाला द्यावी अशी आमची विनंति आहे.'' हे ऐकल्यावर त्या सर्वांची भावना पाहून नारायणमहाराज म्हणाले, ''लोकहो, तुम्ही म्हणता ते अगदी सत्य आहे. माझी आई ही तुम्हाला आईप्रमाणे होती हे अगदी खरे आहे. तेव्हा आईच्या पायाला वंदन करण्याचा आणि तिच्या पालखीला खांदा देण्याचा हक्क माझ्याप्रमाणे तुम्हालाही आहे. आणि परमार्थात जातिभेद नसतोच. तेव्हा माईसाहेबांच्या चरणांना स्पर्श करून खुशाल नमस्कार करा आणि त्यांच्या पालखीला खांदा द्या. माझी हरकत कशी असणार? माझी तुम्हाला परवानगी आहे.'' नारायणमहाराजांचे हे वचन ऐकताच त्या सर्व मंडळींना आनंद झाला. त्यांच्या डोळ्यात पाणी आले. त्या सर्वांनी माईसाहेबांचे पाय घट्ट पकडून त्यांना त्रिवार वंदन केले आणि नंतर अंत्ययात्रा निघाल्यावर त्यांनी पाळीपाळीने माईसाहेबांच्या पालखीला खांदा दिला. अशा प्रकारे माईसाहेबांच्या जयजयकारात त्यांची अंत्ययात्रा सावकाश-सावकाश निघाली. शेवटी ती चिमड गावाबाहेर जेथे साधुमहाराजांच्या दहन स्थानी जो वटवृक्ष लावलेला होता तेथपर्यंत ही यात्रा आली. आणि त्या वटवृक्षाजवळच नारायणमहाराजांनी साश्रु नयनांनी माईसाहेबांचे अंत्यसंस्कार केले. उपस्थित असणाऱ्या सर्वांच्या डोळ्यात अश्रूंची गर्दी होती.

### माईसाहेबांची समाधि

माईसाहेबांच्या निर्वाणानंतर साहजिकच त्यांची समाधि व्हावयास हवी होती. परंतु काहीना काही कारणाने ते काम लांबत गेले. नारायणमहाराजांच्या कारकीर्दीत माईसाहेबांची समाधि होऊ शकली नाही हे खरे.

नारायणमहाराजांच्या निर्वाणानंतर त्यांचे चिरंजीव पंडितराव हे मठपति झाले आणि त्यांच्या कारकीर्दीत माईसाहेबांची समाधि होण्याचा योग आला तो असा :- गंगाधर सिंग हे दरवर्षी चिमडास साधुमहाराजांच्या यात्रेस जात असत. तेथे माईसाहेबांची समाधि नाही हे त्यांना खटकत असे. ती समाधि बांधवून घेण्याचा त्यांचा विचार होता.



आणि तो प्रत्यक्षात येण्यास इ.स.१९८१ हे साल उजाडले. या वर्षी गंगाधरराव सिंग यांच्या पुढाकाराने माईसाहेबांची समाधि चिमडमठाच्या परिसरात बांधली गेली. मठाच्या परिसरात जेथे साधुमहाराजांची समाधि होती, तिचे मागील बाजूस माईसाहेबांची समाधि बांधवून घेण्यात आली. देहत्यागानंतरही समाधीच्या रूपात माईसाहेब आपल्या गुरूंजवळच राहिल्या.

समाधि बांधल्यावर एक सोहळा झाला. समाधीचे पुढे केळीचे खुंट उभे करून विजेची रोषणाई करण्यात आली होती. या सोहळ्यास सांगलीहून श्रीदासराममहाराज चिमडला गेले होते. तेथे पंडितराव यरगट्टीकर आणि उद्धवरावजींचे पुत्र पांडुरंगराव यरगट्टीकर यांच्या परवानगीने माईसाहेबांच्या समाधीपुढे दासराममहाराजांचे कीर्तन झाले आणि परंपरागत पद्धतीने माईसाहेबांची आराधना व आरती झाली. त्यानंतर सर्व उपस्थित मंडळींना महाप्रसाद देण्यात आला. भोजनोत्तर मातोश्री माईसाहेबांचे स्मरण करीत सर्व जण आपापल्या घरी गेले.

चिमड मठाच्या स्थापनेपासून, मठाचा विकास व प्रगति यांना हातभार लावणाऱ्या आणि त्यांना साक्षी असणाऱ्या, येणाऱ्याजाणाऱ्या भक्तांकडे आपुलकीने लक्ष देणाऱ्या, पुत्रपौत्र पहावयास मिळालेल्या, चिमडातील भक्तांवर मातेप्रमाणे प्रेम करणाऱ्या, पतीच्या आज्ञेने उपदेशानुग्रह देणाऱ्या, सर्वांना आदरणीय व पूज्य, चिमडमठाचा एक आधारस्तंभ असणाऱ्या एका संत साध्वीचे समाधिस्मारक आता चिमडमठाच्या परिसरात दिमाखाने उभे आहे.

■■■

## माईसाहेबांची आरती

आरती माईसाहेबा । जय जय स्वयंभा ।
शरण मी तव आलो । होत असे आत्मलाभा ।।ध्रु।।
माईसाहेबांचे पती । रामचंद्र लाभले ।
सेवेसी सर्वकाळ । तन मन वाहिले ।।१।।
साधन करोनिया । कृतकार्य जहाले ।
म्हणून *दासरामे* । चरण शिरी वंदिले ।।२।।

श्रीदासराममहाराज केळकर, सांगली

## संदर्भ ग्रंथ


उद्धवरावजी यरगट्टीकर, दासराम, हस्तलिखित चरित्र

कैवल्यपुरुष, खंड पहिला, ह.पां. कोटणीस, सांगली, १९३३

कैवल्यबोध, र. ह. कोटणीस, सांगली, १९२५

चिमडमहाराज, डॉ. के. वा. आपटे, पुणे पुनर्मुद्रण, १९९८

चिमड संप्रदाय, प्रा.डॉ. के.वा. आपटे, सांगली, अवृत्ति पहिली, २००५

दादामहाराज केळकर यांची हस्तलिखित वही

नारायणमहाराज यरगट्टीकर चरितामृत, दासराम, सांगली, १९७३

नारायणमहाराज यरगट्टीकर यांचे चरित्र, प्रा.डॉ. के.वा. आपटे, सांगली, पहिली आवृत्ति, २०१०

नारायणीय शिष्यप्रबोध, संकलक - व्यं.रा. मोहोळकर, बार्शी, १९९४

निंबरगीकरमहाराज, डॉ. के.वा. आपटे, पुणे, पुनर्मुद्रण, १९९८

महायोगिनी श्रीलक्ष्मीबाई अक्का, डॉ.के.वा. आपटे, पुणे, पुनर्मुद्रण, १९९२

रघुनाथप्रिय साधुमहाराज यांचे चरित्र, प्रा.डॉ. के.वा. आपटे, सांगली, पहिली आवृत्ति, २००६

श्रीतात्यासाहेबमहाराज कोटणीस, दासराम, पुणे, प्रथमावृत्ती, १९८३

सन्मार्गदीप, समर्थ भक्त, चिमड, तृतीय आवृत्ति, २०००

सांगली माहात्म्य, दासराम, सांगली, १९८८

सिद्धकथामृतसार, रा.गो. केळकर, सिद्धगिरि संदेश त्रैमासिक, जून - सप्टेंबर, १९७३

हणमंतरावजी कोटणीस यांचे चरित्र, साधुदास, सांगली, १९३७




## माईसाहेबांचा निर्वाणाचा अभंग

शालिवाहन शके अठराशे त्रेसष्टात ।<br>
वृष संवत्सरात उत्तरायण ।।१।।<br>
माघ वद्य एकादशी आणि बुधवार ।<br>
दिवसा चौथे प्रहरी पाचवे तासी ।।२।।<br>
माईसाहेबांनी केले हो निर्याण ।<br>
स्वरूपी तल्लीन ऐक्य झाले ।।३।।<br>
परब्रह्मरूपी मिळोनिया गेल्या ।<br>
कीर्तिरूपे उरल्या *दासापाशी* ।।४।।

श्रीदासराममहाराज केळकर, सांगली

## माईसाहेबांचे माहात्म्य

माईसाब माऊली ग माय माझी । माईसाब माऊली ।।ध्रु।।<br>
रामायणीची सीता पुनरपि । जगती अवतरली ।।१।।<br>
जगदुद्धारा सीता-रूपे । चिमडमठी राहिली ।।२।।<br>
दीर्घायु जी रोगरहितची । सर्वकाळी राहिली ।।३।।<br>
मायाळू ती मायमाऊली । भक्तांना भावली ।।४।।<br>
साधुराजच्या पूर्ण कृपेने । पूर्णत्वा पावली ।।५।।<br>
ऐसी माता पुनः न होणे । करी सर्वां साऊली ।।६।।

प्रा. डॉ.के.वा. आपटे, सांगली

## श्रीदासराममहाराजांची आरती

आरती रामराया । करी कृपेची छाया ।<br>
दावोनी दीनी दया । धन्य धन्य महाराजा ।।ध्रु.।।<br>
सद्गुरू हनुमंत । पिता गोविंद संत ।<br>
बोधी गुरुलिंग सिद्ध । धरुनि रूप सिद्धानंद ।।१।।<br>
सिद्धसाधनाने । स्वये ब्रह्मचि झाले ।<br>
भावादरे *केशवाने* । चरणी मस्तक ठेविले ।।२।।

- प्रा. डॉ. के. वा. आपटे

## श्रीमामामहाराजांची आरती

आरती गोविंदा । नित्य कीर्तनानंदा ।
सच्चिदानंदकंदा । गुरुलिंग साधुबोधा ।।ध्रु।।
हनुमंत सद्गुरुआज्ञे। केले अखंड कीर्तन ।
सर्वस्व वेचियेले । समर्पिले पंचप्राण ।।१।।
ब्रह्मचैतन्यादि संत । भाऊराव समर्थ ।
रामचंद्र नारायण । नाम बोधी हे कथित ।।२।।
श्रीराम जयराम जय जय राम । तेरा अक्षरी परम ।
संदेश निर्वाणीचा । पायी लोळे *दासराम*।।३।।

– श्रीदासरामहाराज केळकर

## चिमड-संप्र-दाय-गुरु-शिष्य-परं-परा

भगवद्गुरुसोमेशं नमामि विनतकाय: ।
ततो रेवणसिद्धेशं जगत: प्रथमं गुरुम् ।।१ ।।
तदन्ते वासिनं नत्वा मरुळ-प्रभु-योगिनम् ।
काडसिद्धमहं स्तौमि तच्छिष्यप्रमुखेश्वरम् ।।२ ।।
गुरुलिंगं गुरुं वंदे ततो नारायणं वरम् ।
रघुनाथप्रियं साधुं गृहीत-जटिल-व्रतम् ।।३ ।।
रामचंद्रं गुरुं नौमि रामस्य धृततेजसम् ।
हनुमंतमुपासेऽहं राम-कीर्तन-तत्परम् ।।४ ।।
दासरामं ततो वंदे शिष्यं हनुमत: प्रियम् ।
स्तुत्येयं वंदनीया च गुरु-शिष्य-परंपरा ।।५ ।।

– प्रा. डॉ. के. वा. आपटे

## श्रीदासराम-रक्षा-स्तोत्रम्

अस्य श्रीदासराम-रक्षा-स्तोत्रस्य *केशव:* कवि: । श्रीदासरामो देवता । अनुष्टुप् छंद: । श्रीसीता शक्ति: । श्रीदासराम-प्रीत्यर्थेजपे विनियोग: ।

।। अथ ध्यानम् ।।

गौरांगं मनसा ध्यायेद् दासरामं दयाकरम् ।
सीता-पतिं च श्रीरामं स्वरूपस्थं सुखप्रदम् ।।

।। इति ध्यानम् ।।



गुरुलिंग-प्रियं ध्यात्वा देव-सेवा-परायणम् ।
रक्षा-स्तोत्रं पठेद् भक्त इच्छन् सकल-रक्षणम् ।।१।।
महात्मा मस्तकं पातु भालं भक्तार्थ-पूरक: ।
इंदिरा-तनयो नेत्रे कर्णौ कैवल्य-कारक: ।।२।।
घ्राणं पातु गुणागारो मुखं गोविंद-पुत्रक: ।
दयालू रक्षतु दंतान् ओष्ठौ कीर्तन-कर्तृक: ।।३।।
जिह्वां बोध-निधि: पातु पुष्कराक्ष: प्रियंवद: ।
वाणीं पातु प्रियालापी परमार्थ-प्रभाकर: ।।४।।
हनुं हर्ष-समायुक्त: प्रसन्न-वदनस्तथा ।
कंठं पातु कृतार्थश्च स्कंधौ पातु सदा शिव: ।।५।।
भुजौ पातु महाभक्त: करौ निर्वाण-दायक: ।
हृदयं पातु ह्री-युक्तो मध्यं माया-प्रभंजन: ।।६।।
उदरं पातु ऊर्जस्वी परमात्मा परात्पर: ।
नाभिं पातु महानाद: कटी कारुण्य-संयुत: ।।७।।
ऊरू साधूत्तम: पातु सक्थिनी सुर-संस्तुत: ।
जानुनी जपकृत् पातु जंघे काम-निवारक: ।।८।।
गुह्ये पातु सुधी: श्रेष्ठ: परेश: पातु मे पदे ।
प्राणान् पातु परात्मा च शरीरं पातु शक्तिमान् ।।९।।
आंतरं करणं पातु हनुमद्-गुरु-सेवक: ।
अंतर्बहिश्च मां नित्यं पातु संपूर्ण-साधन: ।।१०।।
देह-दु:ख-भयार्तिभ्य: सिद्धानंद-प्रिय: सदा ।
उपरिष्टादधस्ताच्च पातु वै पुत्र-पूजित: ।।११।।
पुरत: पृष्ठतश्चैव तथा देहस्य पार्श्वकौ ।
महाभाग्य: सदा पातु भव-भीति-विनाशन: ।।१२।।
कुप्रसंगाच्च दु:स्वप्नात् रक्षतु करुणार्णव: ।
अनारोग्यात् तथा चैव पातु वै परमेश्वर: ।।१३।।
सर्वस्वं दासरामो मे सर्वेश: सत्त्ववान् किल ।
दासरामं विना चान्यं नैव जानामि नैव च ।।१४।।
गुरवे दासरामाय सच्चिदानंद-रूपिणे ।
महा-मानव-नाथाय वारं वारं नमो नम: ।।१५।।

।। इति श्रीदासराम-रक्षा-स्तोत्रं संपूर्णम् ।।

## ❊ श्रीदासराम ग्रंथमाला पुष्प यादी ❊

| श्रीदासराम ग्रंथमाला | पुष्प क्रमांक | प्रकाशन वर्ष |
|---|---|---|
| चिमड संप्रदाय | १ | २००५ |
| श्रीरामदासस्वामी चरित्र | २ | २००६ |
| भजन तरंग | ३ | २००६ |
| हरिपाठ संकीर्तन | ४ | २००७ |
| श्रीदासराममहाराज नित्यपाठ चरित्र | ५ | २००७ |
| दासबोधातील तत्त्वज्ञान | ६ | २००७ |
| दासराममहाराज : वचनसंग्रह | ७ | २००८ |
| श्रीरघुनाथप्रिय साधुमहाराज यांचे चरित्र | ८ | २००९ |
| साधनसंध्या | ९ | २००९ |
| अनंत अमृत स्मरण | १० | २००९ |
| श्रीगुरुमहिमा | ११ | २००९ |
| श्रीज्ञानेश्वरी प्रसाद | १२ | २००९ |
| श्रीदासरामगाथा पुरवणी | १३ | २००९ |
| श्रीदासराममहाराज : आत्मचरित्र | १४ | २०१० |
| श्रीनारायणमहाराज यरगट्टीकर यांचे चरित्र | १५ | २०१० |
| श्रीदासराममहाराजकृत श्लोकरचना | १६ | २०१० |
| अनुभवामृत : श्रीदासराममहाराजकृत समओवी टीकेसह | १७ | २०१० |
| श्रीदासरामहाराज सहस्रनामस्तोत्रम् | १८ | २०१० |
| आत्माराम (श्रीदासराममहाराजकृत गद्य अर्थासह) | १९ | २०१० |
| श्रीगुरुलिंगगीता (कानडी लिपीत) | २० | २०१० |
| श्रीगुरुलिंगगीता (मराठी) | २१ | २०१० |
| श्रीरामनिकेतन (परिचय पत्रिका) | २२ | २०११ |
| श्रीरामनिकेतनमधील आराधना | २३ | २०११ |
| ग्रंथत्रयी | २४ | २०११ |
| उत्तरगीता (श्रीदासराममहाराजकृत गद्य अर्थासह) | २५ | २०११ |
| अभंग दरबार | २६ | २०११ |
| सद्‌बोध दशक | २७ | २०११ |
| श्रीदासराममहाराजांचे नित्यपाठचरित्र (३ री आवृत्ति) | २८ | २०११ |
| श्रीगुरुराज कथित ज्ञान आणि बोध | २९ | २०११ |